# नवा अध्याय

'नमो' नमः

आपल्या महाराष्ट्र सेवा संघाचे हे ७७ वे वर्ष. आपली संस्था पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहते, मात्र हे वर्ष 'नमो' मय वर्ष होते हे मान्य करायलाच हवे. देशाच्या इतिहासात एक नवीन अध्याय लिहिला जात आहे. नवे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांचे हार्दिक अभिनंदन आणि मनापासून शुभेच्छा. चांगले दिवस आणणाऱ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत आपली संस्था सदैव सक्रिय असते आणि राहील.

२०१२-१३ मध्ये दृष्टिबाधितांसाठी 'नॅब'च्या सहकार्याने दृष्टिसेवा केंद्र, व्हायोलीन ॲकॅडमीच्या सहकार्याने संगीत महोत्सव आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने ग्रंथ तुमच्या दारी हे नवीन उपक्रम सुरू झाले. तर या वर्षात महाराष्ट्र टाईम्सच्या माध्यम भागीदारीने अर्थप्रबोधन व्याख्यानमाला, श्री. अजित करंदीकर यांच्या प्रायोजकत्वाने 'उद्योजक सन्मान सोहळा', वैज्ञानिक दृष्टी जोपासण्यासाठी विज्ञान विभाग हे नवे अध्याय लिहिले गेले. जे नवे सुरू होते ते नेटाने, सातत्याने आणि अधिकाधिक गुणवत्तेने पुढे नेले जाते हे संस्थेचे वैशिष्ट्य. आणखी दोन नवे उपक्रम म्हणजे बॉम्बे मेडिकल एड फाउंडेशनच्या सहकार्याने आपण चालवीत असलेल्या धर्मादाय दवाखान्यात फिजिओथेरेपी केंद्र सुरू झाले आणि महत्त्वाचे म्हणजे संस्थेने 'आपुलकी' या नावाचे त्रैमासिक मुखपत्र सुरू केले. सकारात्मक विधायक आणि प्रेरक असेच साहित्य यातून प्रसिद्ध करावे अशी आमची भूमिका आहे. श्रीमती सुषमा पाटणकर या त्याच्या कार्यकारी संपादक आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या बालनाट्य स्पर्धेत संस्थेच्याच श्री. द. व. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'जिनी-मिनीची गोष्ट' या बालनाट्यास उल्लेखनीय यश मिळाले.

ऐरोली शाखेत म्हणजे म. बा. देवधर संकुलात सभागृह वातानुकूलित झाल्याचे लाभ जाणवत आहेत. तेथे स्वतंत्र ध्वनिसंयोजन यंत्रणाही आपण कार्यान्वित केली. तिथल्या ग्रंथालयाला सौ. सुनीता देवधर यांचे नाव देऊन त्यांनी केलेल्या कार्याविषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली. विश्वस्त श्री. म.बा. देवधर यांनी लिहिलेल्या व्यसनमुक्तीवरील 'नशासूराचे विश्वव्यापी थैमान' या पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही झाले. तिथे सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम उत्तम तऱ्हेने सुरू आहेत. तिथल्या अभ्यासिकेचा ५०० हून अधिक विद्यार्थी लाभ घेत असतात ही समाधानाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

कला विभाग, संस्कृत विभाग, मैत्री-मैत्रेयी, ग्रंथालये, आरोग्य, विज्ञान, अर्थ विभाग नित्याप्रमाणेच कार्यरत आहेत, गद्रे पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार, संस्कृतसाठी पं. लाटकरशास्त्री पुरस्कार, डॉ. मा.गो.खांडेकर स्मृति 'एक कलाकार-एक संध्याकाळ' पुरस्कार, कै.अशोक सहस्त्रबुद्धे स्मृतिदिन, मैत्रेयी पुरस्कार, पॉप्युलर प्रकाशनच्या सहकार्याने 'प्रिय रसिक' संमेलन, गिरिमित्र संमेलन, कै. लक्ष्मणराव महाबळ स्मृत्यर्थ भक्तिप्रधान कार्यक्रम, विद्यार्थी-सन्मान सोहळा, या निमित्ताने अनेक ज्येष्ठ कलाकार, साहित्यिक, विचारवंत, समाजसेवक संस्थेत येतात.

अशी ही ज्ञान-मनोरंजन आणि सेवा यांची पवित्र गंगा आहे. या शुद्ध गंगेत स्वतः तर न्हाऊन घ्याच; पण इतरांनाही सहभागी करा. चांगल्या लोकांच्या सहवासाचा लाभ घ्या. रसिक म्हणून आणि कार्यकर्ते म्हणून या संस्थेत तुमचे स्वागतच आहे.

संस्थेच्या माध्यमातून देशाच्या इतिहासातील नव्या अध्यायातला आपण एक श्लोक बनू या.

.....चं. ना. वझे.
अध्यक्ष.

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड


विश्वस्त मंडळ

श्री. चं. ना. वझे (अध्यक्ष - पदसिद्ध)

श्री. म. बा. देवधर
श्री. सु. ना. पाटणकर
डॉ. आ. रा. कट्टी
डॉ. अ. प्र. फडणीस
श्री. उ. कृ. हंबर्डे
श्री. मु. द. भुसारी

**कार्यकारी मंडळ**

पदाधिकारी

श्री.चं. ना. वझे -अध्यक्ष
श्री.चं. म. कुलकर्णी–उपाध्यक्ष
श्री.प्र. श्री. नाटेकर- कार्यवाह
श्री.ध. दि. दिवेकर- कोषाध्यक्ष
श्री.वि. म. सौदागर - सहकार्यवाह
श्री.र. द. लाड - सहकोषाध्यक्ष
श्री.ज. र. बर्वे - सहकार्यवाह

**सदस्य**

श्री.र. दे. धामणकर
श्री.द. व. कुलकर्णी
श्री.प्र. र. सप्रे
श्री.वि. ज. जोगळेकर
श्री.अ. मो. भंडारे
श्री. वि. वा. वझे
श्री.प्र. रा. दामले
श्री. स. श्री. पाटणकर
श्री. वि. स. जोशी (स्वीकृत ११.८.१४ पासून)
श्री. प्र. ह. सडेकर (स्वीकृत ११.८.१४ पासून)
श्री. कि.म. पेंढरकर (स्वीकृत ११.८.१४ पासून)
श्री. शं.गो. वीरकर(स्वीकृत११.८.१४ पासून)

**ऐरोली व्यवस्थापन समिती**

डॉ. आ. रा. कट्टी - अध्यक्ष
श्री. प्र. र. सप्रे - उपाध्यक्ष
श्री. कि. म. पेंढरकर -कोषाध्यक्ष
श्री. शं. गो. वीरकर - कार्यवाह
श्री. मु. शं. बालंखे
श्री. अ.रा. दाभोळकर
श्री. वि. दा. जगताप
श्रीमती सुनीता म. देवधर
श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध)
श्री. प्र. श्री. नाटेकर (पदसिद्ध)

**मानद अंतर्गत हिशेब तपासनीस**

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्री. चंद्रकांत पांपट(ऐरोलीसाठी)

**हिशेब तपासनीस**

मेसर्स सिंगवी, ओतूरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब

श्रीमती सुरेखा जोशी

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार

श्री. श्रीरंग भाष्टे

श्री. भास्कर इंगळे

श्री. राम पाणकर (कंत्राटी सेवक)

श्री. रामचंद्र झोंबाड (कंत्राटी सेवक)

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती अलका चौधरी

श्रीमती आरती रणदिवे

श्रीमती जान्हवी राणे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर

श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती मेघा भावे

श्रीमती विनीता घाडीगांवकर

श्रीमती शीतल सगरे

श्रीमती संजना जंगम

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड

श्री. शंकर शिंगोटे

श्री. सुरेंद्र राणे

श्री. तुकाराम घाणेकर (कंत्राटी सेवक)

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mssmulund.com

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,

ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)

मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४) रविवार, दि. १० ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ५.०० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामे**

१. दि. ११.८.२०१३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्ताला संमती देणे.

२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०१३-१४ सालच्या अहवालास मान्यता देणे.

३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०१३-१४ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.

४. २०१४-१५ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.

५. २०१४-१५ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६. २०१४-१५ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.

७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.

८. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातील एका रिक्त सदस्याची जागा भरणे.

९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ५ सदस्यांच्या जागा भरणे.

१०. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.

११. संस्थेच्या मुलुंड येथील वास्तूचा पुनर्विकास करण्यासंबंधीच्या कार्यवाहीची माहिती घेणे.

१२. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

**विशेष सूचना**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २८ जुलै २०१४ ते बुधवार, दि.६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.

३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि. ७ ऑगस्ट २०१४ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.

४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.

५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.

६. विश्वस्तपदावरून डॉ.अ. प्र. फडणीस निवृत्त होत आहेत आणि कार्यकारी मंडळातून सर्वश्री ध.दि.दिवेकर, र. दे. धामणकर, प्र.र. दामले, वि. वा. वझे, स.श्री. पाटणकर निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री चं.दि.खरे ,श्रीहरी भी. कुलकर्णी, व सु. स. सहस्त्रबुद्धे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. चं.दि. खरे निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. एक विश्वस्त व कार्यकारी मंडळातील ५ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.१० ऑगस्ट २०१४ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०१३ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल. (सभासद क्र. आजीव ८५७ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २८ जुलै २०१४ ते ४ ऑगस्ट २०१४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळ-तील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.५ ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे. नामांकन पत्रांची छाननी दि. ५ ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ७.३० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ५ ऑगस्ट २०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि. ७ ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि. ८ ऑगस्ट २०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. २१ जुलै २०१४ — प्र.श्री. नाटेकर (कार्यवाह)

**टीप : सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

## ऋणनिर्देश

मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्र वाहिन्या, सर्व वार्ताहर, एक्सप्रेशन फोटोग्राफिक्स, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, कै. अनंत श्रीधर ओक चॅरिटेबल ट्रस्ट, ओक वनौषधी प्रकल्प, डॉ.दीपक घुमे, आरोग्य केंद्राला औषधे व अन्य सहकार्य करणारे मुलुंड व कर्जतमधील सर्व डॉक्टर्स व कार्यकर्ते, डॉ. विकास महात्मे, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, कामत बॅन्क्वेटस् चे श्री. सतीश कामत , वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कं. मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी, चंद्रकांत पांपट, श्री. माधव शिरवळकर, समीर कर्वे, चिंतामणी भिडे, अजय पाटणकर, ऐरोलीतील 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, 'सकाळ' चे संपादक श्री. विजय पात्रूडकर, श्री. आनंद मते, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, केसरी टूर्स, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालये , ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

प्र. श्री. नाटेकर (कार्यवाह) — चं. ना. वझे (अध्यक्ष)

**टीप -**
अहवाल अद्ययावत करण्यासाठी त्यात संस्थेतील जून १४ पर्यंतच्या घडामोडी देण्यात आल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी. आर्थिक नोंदी मात्र ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या आहेत.

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा ➔** | **१** | **५** | **९** |
| १ | श्री. चं.ना.वझे | १ | ५ | ९ |
| २ | श्री. म.बा.देवधर | १ | २ | - |
| ३ | श्री. सु.ना. पाटणकर | - | ३ | - |
| ४ | श्री.आ.रा. कट्टी | १ | २ | - |
| ५ | श्री.मु.द.भुसारी | १ | ४ | - |
| ६ | श्री.अ.प्र. फडणीस | १ | ५ | - |
| ७ | श्री. उ.कृ.हंबर्डे | १ | ४ | - |
| ८ | श्री.चं.म.कुलकर्णी | - | ५ | ९ |
| ९ | श्री. प्र.श्री. नाटेकर | - | ५ | ९ |
| १० | श्री.ध.दि.दिवेकर | - | ३ | ७ |
| ११ | श्री.र.द.लाड | - | ५ | ९ |
| १२ | श्री.अ.मो.भंडारे | - | ५ | ७ |
| १३ | श्री.वि.म. सौदागर | - | ५ | ७ |
| १४ | श्री.र.दे.धामणकर | - | ५ | ७ |
| १५ | श्री. प्र.र. सप्रे | - | ४ | ७ |
| १६ | श्री.द.व.कुलकर्णी | - | ५ | ४ |
| १७ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | ४ | ८ |
| १८ | श्री.ज.र.बर्वे | - | ५ | ८ |
| १९ | श्री.प्र.रा. दामले | - | ४ | ६ |
| २० | श्री.वि.वा.वझे | - | ५ | ७ |
| २१ | श्री.स.श्री.पाटणकर | - | ४ | ९ |
| २२ | श्री. वि.स.जोशी | - | ५ | ८ |
| २३ | श्री.प्र.ह.सडेकर | - | ४ | ७ |
| २४ | श्री.कि.म.पेंढरकर | - | २ | ५ |
| २५ | श्री.शं.गो.वीरकर | - | १ | ५ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यासाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च१३अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च १४ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ९ | – | - | ९ |
| आधारस्तंभ | १३ | - | - | १३ |
| आश्रयदाते | ८ | - | - | ८ |
| आजीव | ७०४ | १७ | ५ | ७१६ |
| **एकूण** | **७३४** | **१७** | **५** | **७४६** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे १८२ / ऐरोली येथे -३५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम - **मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ६३पू | ६६ स | २४ दिवस | २४ |

**ऐरोली वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ५७ पू/२८ स<br>१४ | ५७पू/२४ स<br>१४ | १४५स |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार

**श्रद्धांजली**

श्री. वसंत अनंत पंडित (आजीव३५७), श्री. वसंत गोविंद फडके(आजीव४४३),श्री. पांडुरंग चिंतामणी जोशी(आजीव७२), डॉ. सुरेश रेळे (आजीव१२९), श्री. रत्नाकर बाळकृष्ण कर्पे (आजीव१५३), श्री. दत्ताजी ताम्हणे (सन्माननीय सभासद क्र.१), श्रीमती जयमाला शिलेदार, श्री. नरेंद्र दाभोळकर, श्री. जयंतराव साळगांवकर, मन्ना डे, श्री. अशोक जैन (सु.ल.गद्रे साहित्यिक पुरस्काराचे मानकरी), श्री. शं.ना. नवरे (सु.ल.गद्रे साहित्यिक पुरस्काराचे मानकरी), सुधीर मोघे (गीतकार) , व केंद्रीय मंत्री श्री. गोपीनाथजी मुंडे यांचे अहवालसाली निधन झाले. त्यांना संस्थेच्या वतीने श्रद्धांजली!

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



संस्थेचे एकेकाळचे कार्यकर्ते वसंत फडके यांचे अहवालसाली निधन झाले. संस्थेच्या १९८६ ते १९९० या सलग पाच वर्षांत फडके यांनी 'सं.होनाजी बाळा', 'सं.शारदा', सं. जय जय गौरी शंकर, सं. मृच्छकटिक, व सं. पंडितराज जगन्नाथ अशी पाच नाटके संस्थेतर्फे राज्यनाट्यस्पर्धेत सादर केली. यांतील तीन नाटकांना द्वितीय क्रमांक मिळाला. व इतरही अनेक वैयक्तिक बक्षिसे मिळाली होती. महाराष्ट्र सेवा संघाच्या वतीने ही विनम्र आदरांजली.


**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या**
**गिरिमित्र संमेलनासाठी**

| अनु. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम - रुपये |
|---|---|---|
| १ | सारस्वत बँक | १,००,०००.०० |
| २ | अख्तर एंटरप्रायझेस | २०,०००.०० |
| ३ | हिमालयन क्लब | २५,०००.०० |
| ४ | गिरनार फूड प्रा. लि. | २५,०००.०० |
| ५ | प्रॉडक्ट प्रमोशन्स | २५,०००.०० |
| ६ | पेटझेल | १०,०००.०० |
| ८ | इतर देणग्या | ४४,०००.०० |
| | **एकूण** | **२,४९,०००.००** |
| **आरोग्य विभागासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | कै. अनंत श्रीधर ओक चॅरिटेबल ट्रस्ट | ३५,०००.०० |
| २ | स्पार्क इलेक्ट्रोसिस्टिम्स | २०,०००.०० |
| ३ | किरण देशमुख | १०,०००.०० |
| | **एकूण** | **६५,०००.००** |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (पुरस्कारांसाठी) | १,००,०००.०० |
| २ | इंदर ग्लास अँड ॲल्युमिनियम | ११,०००.०० |
| ३ | श्री. जयंतराव साळगांवकर (संस्कृत पुरस्कारासाठी) | १,०२,०००.०० |
| ६ | श्री. चं. ना. वझे (पुरस्कारांसाठी) | १०,०००.०० |
| ७ | श्री. अजित करंदीकर | ५०,०००.०० |
| ८ | इतर देणग्या | १,९००.०० |
| | **एकूण** | **२,७४,९००.००** |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. यशवंत अनंत केळकर | १,१०,०००.०० |
| २ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | १०,०००.०० |
| ३ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढी | ३९,७८१.०० |
| | **एकूण** | **१,५९,७८१.००** |
| **विज्ञान विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. चं. ना. वझे | १०,०००.०० |
| २ | श्री. दिपक बाळगी | १०,०००.०० |
| | **एकूण** | **२०,०००.००** |
| | मैत्रेयी विभागाला मिळालेल्या देणग्या | **४,००१,००** |
| | संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या | **१,५००.००** |
| | | |

| अनु. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम - रुपये |
|---|---|---|
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सुषमा श्रीकांत जोशी | २५,०००.०० |
| २ | श्रीमती उदय साठ्ये कुटुंबीय | २५,०००.०० |
| ३ | श्री. मिलिंद पाटील | १०,०००.०० |
| ४ | श्रीमती मीना खाडिलकर | ३०,०००.०० |
| ५ | श्री. किरण देशमुख | १०,०००.०० |
| ६ | इतर देणग्या | १,५५,२५२.०० |
| | **एकूण** | **२,५५,२५२.००** |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. हेमंत रणदिवे | २५,०००.०० |
| २ | श्री. हेमचंद्र नेमाडे | ५१,०००.०० |
| ३ | श्री. किरण देशमुख | २१,०००.०० |
| ४ | इतर देणग्या | १,५००.०० |
| | **एकूण** | **९८,५००.००** |
| **संगीत महोत्सवासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | साई एंटरप्रायझेस | १५,०००.०० |
| २ | इंदू एंटरप्रायझेस | १५,०००.०० |
| ३ | राजदीप प्लास्टिक्स् | २०,०००.०० |
| ४ | गौरांग असोसिएट्स | १५,०००.०० |
| ५ | कल्याण हॉस्पिटल (डॉ. हितेंद्र दहिवदकर) | १०,०००.०० |
| ६ | इतर देणग्या | १५,००२.०० |
| | **एकूण** | **९०,००२.००** |

## विनम्र आदरांजली

थोर स्वातंत्र्यसेनानी , सच्चे समाजसेवक, व्यासंगी साहित्यप्रेमी, माजी आमदार, मुलुंडचेच नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण, देशप्रेमी, सर्वांचे प्रेरणास्त्रोत, महाराष्ट्र सेवा संघाचे सन्माननीय सभासद, आणि हितचिंतक, मानवतेचे उपासक, मुलुंडमधील लोकप्रिय व आदरणीय व्यक्तिमत्त्व शतकयोगी श्री. दत्ताजी बाळकृष्ण ताम्हणे तथा दत्ताजी यांचे वयाच्या १०१ व्या वर्षी, दि. ७ एप्रिल,२०१४ या दिवशी दु:खद निधन झाले. अखेरपर्यंत त्यांच्या मनात समाजहिताचा ध्यास होता. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या आत्म्यास शांती व सद्‌गती लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना. महाराष्ट्र सेवा संघाच्या वतीने ही विनम्र आदरांजली.



## संस्थेने दिलेल्या देणग्या

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | जलवर्धिनी प्रतिष्ठान | १०,०००.०० |
| २ | कुसुमाग्रज प्रतिष्ठान | २०,०००.०० |
| ३ | न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था | ५,०००.०० |
| ४ | हरियाली संस्था | ५,०००.०० |
| ५ | राजहंस प्रतिष्ठान ट्रस्ट | ५,०००.०० |
| ६ | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल | १०,०००.०० |
| ७ | नववर्ष स्वागत समिती | ३,०००.०० |
| ८ | सह्याद्री मानव सेवा मंच, ठाणे (आरोग्यासाठी) | १०,०००.०० |
| ९ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था (पुणे) -शैक्षणिक | ५,०००.०० |
| | **एकूण** | **७३,०००.००** |

## महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम

| अनु.क्र. | दिनांक | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|---|
| १ | २२.०९.१३ | महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार | **पुरस्कार प्राप्त संस्था -** सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध. **विशेष सहभाग** - श्री. विनायक दीक्षित, वसंत साठे, राजन हाडळ, संतोष पादिर. **प्रमुख पाहुणे** - डॉ. स्नेहलता देशमुख, **मुलाखतकार**- प्रदीप सप्रे, चंद्रशेखर कुलकर्णी |
| २ | १२.०१.१४ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | **पुरस्कारप्राप्त साहित्यिक** - श्री. निरंजन घाटे **प्रमुख पाहुणे** - डॉ. बाळ फोंडके **मुलाखतकार -** डॉ. मेघश्री दळवी |
| ३ | ३०.०३.१४ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे कलाकार पुरस्कार | **पुरस्कारप्राप्त कलाकार** -सुप्रसिद्ध शिल्पकार श्री. उत्तम पाचारणे, **प्रमुख पाहुणे** -श्री. वासुदेव कामत, **मुलाखतकार-** श्री. प्रमोद बापट |
| | | **नियमित व इतर कार्यक्रम** | |
| ४ | १४.०६.१३ | महाराष्ट्र सेवा संघ व व्यास क्रिएशन्स, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक - दत्ताजी ताम्हणे यांचा शतकपूर्ती सोहळा | ''शतकयोगी'' या चरित्रग्रंथाचे रसिकार्पण - माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते सत्कार. प्रमुख वक्ते - श्री. अरूण टिकेकर. |
| ५ | ०४.०८.१३ | वर्षा सहल | वज्रेश्वरी |
| ६ | १५.८.२०१३ | झेंडा वंदन | स्वातंत्र्य दिन तसेच शतायुषी दत्ताजी ताम्हणे यांच्याशी दिलखुलास साहित्यिक, काव्यमय गप्पांचा कार्यक्रम. संवादक - श्रेयसी मंत्रवादी |

| अनु.क्र. | दिनांक | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|---|
| | | | |
| ७ | २०.०९.१३ | गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सन्मान सोहळा, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अपना बाजार,मुलुंड(प.) यांच्या संयुक्त विद्यमाने | प्रमुख पाहुणे - श्री. चं. म. कुलकर्णी, उपाध्यक्ष - महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड , श्री. डॉलर शहा - अध्यक्ष - रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. अनिल गंगर - कार्याध्यक्ष, अपना बाजार |
| ८ | ०७.०९.१३ | महाराष्ट्र सेवा संघ व इंदू एंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने पेरेंटिंग या विषयावर परिसंवाद | सहभाग - नाटककार - रत्नाकर मतकरी, सुप्रिया विनोद,संदीप पाठक,(मानसोपचार तज्ज्ञ) अरूण नाईक, तुषार दळवी, निवेदन - अतुल परचुरे |
| ९ | १६.११.१३ | सु. ल. गद्रे स्मृतिदिनानिमित्त आदरांजली. मो.ग.रा. एक सुरेल संस्मरण अर्थात ''ज्योत्स्ना भोळे'' यांच्या जन्म शताब्दीनिमित्त एक विशेष कार्यक्रम. | **लेखन संकल्पना**- सौ.वीणा नाटेकर, **संगीत मार्गदर्शन** - प्रदीप नाटेकर, किशोर देशमुख, **सूत्रसंचालन** - मृण्मयी चंद्रचूड , **गायिका**- मीनल भाटवडेकर, मानसी देशमुख, उत्तरा फडके, **नाट्यवाचन** - मृण्मयी व प्रसाद गोडसे |
| १० | २२.०२.१४ | कै. अशोक सहस्त्रबुद्धे स्मृतिदिनानिमित्त ''मानसीचा चित्रकार तो'' पी. सावळाराम आणि संगीतकार वसंत प्रभु यांच्या सुरेल रचना | **संहिता** - द. व. कुलकर्णी, **संगीत संयोजन** - अतुल माळी, **गायिका** - स्वप्ना गोठिवलेकर व स्मुग्धा माळी, **सूत्रसंचालन** - स्वाती कुलकर्णी. |
| | | **वर्धापनदिन सोहळा** | |
| ११ | २६.१०.१३ | आशय प्रॉडक्शन निर्मित रत्नाकर मतकरी लिखित नाटक 'सुखान्त' | **कलाकार**- चारूशीला साबळे, मोहन जोशी, **दिग्दर्शक** - मंगेश कदम, संगीत - अशोक पत्की |
| १२ | २७.१०.१३ | संगीत विश्वातील दोन अनमोल रत्ने डॉ. वसंतराव देशपांडे व पं.राम मराठे | दुर्मीळ छायाचित्रण, ध्वनिमुद्रण, आठवणी, किस्से ऑडियो व्हिज्युअल्स सहित कार्यक्रम. **सादरकर्ते**- मुकुंद मराठे व विद्याधर ओक |
| १३ | ०२.११.१३ | दिवाळी पहाट - गीतरामायण | **गायक** - अमित नेसरीकर, **निरूपण** - चंद्रशेखर वझे |

**अभिप्राय :**

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड या संस्थेचे अद्ययावत ग्रंथालय पाहून मी एक 'ग्रंथ'च झालो. अश्वत्थ वृक्षच झालो.

.....श्री. चंद्रकांत खोत

मुलुंड उपनगरीची सांस्कृतिक समृद्धी येथेच आढळली मनाचे उन्नयन, जगण्याची उर्जा, जीवनाचा साक्षात्कार घडविणारे हे मंदिर आहे. नानाविध उपक्रमांची रेलचेल, सुसज्ज व देखणे ग्रंथालय, सेवाभावी कार्यकर्ते आणि सेवक यांचा सुरेख संगम, या ठिकाणी झालेला आहे. या ग्रंथालयातील ग्रंथसंपदा पाहिल्यावर निवांतपणे ज्ञानानंद घ्यावा असे कुणालही वाटावे. मलाही तसेच वाटले. सर्वांना या निरपेक्ष सेवेबद्दल धन्यवाद!

.....दत्ता भोसले

# कौतुक सोहळा - गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान

महाराष्ट्र सेवा संघातर्फे मुलुंड मधील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली विविध पारितोषिके :

**कै. राम गणेश गडकरी पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उच्च मराठी विषय घेऊन मराठीत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| विधी उदय जोशी | एस्.एम्.पी.आर् (गुजराथी) | ९४/१०० |

**महर्षी अण्णासाहेब कर्वे पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कनिष्का दोशी | लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूल | ९७.७३ % |

**कै. अंबादास डांगे पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कनिष्का दोशी | लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूल | ९७.७३ % |

**श्री. सु.ल. गद्रे पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील महानगर पालिकेच्या माध्यमिक मराठी विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रणाली कांबळे | | ७३.२७ % |

**कै. विठ्ठलराव व कै. सुशीला घाटणेकर पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कनिष्का दोशी | लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूल | ९७.७३ % |

**सौ सुषमा केतकर पारितोषिक :** मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कनिष्का दोशी | लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूल | ९७.७३ % |

**कै. डॉ. सदाशिव अं. डांगे स्मृती पारितोषिक :** मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधील शाळांतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यात व प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| १) कनिष्का दोशी | लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूल | ९७.७३ % |
| २) निलेश शहा | सेठ करमशी कानजी स्कूल | ९७.४० % |

**कै. हरेश्वर केशव लोखंडे स्मृती पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील माध्यमिक शाळांतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रणाली कांबळे | | ७३.२७ % |

**कै. मुरलीधर सुका चौधरी पारितोषिक** : मार्च २०१३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील शाळांतून गणित विषयात उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| १) ऐश्वर्या सुब्रमण्यम | वाणी विद्यालय | १४८ |
| २) राहुल राडे | विद्या प्रबोधिनी | १४८ |
| ३) दिशा शहा | सेंट मेरीज कॉन्हेंट | १४८ |

**अभिप्राय :**

कुठलेही ग्रंथालय मला आवडतेच. ग्रंथालयात अधिक वेळ घालवायला मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता.

.....निरंजन घाटे

## संस्कृत विभाग

चं. म. कुलकर्णी, (अध्यक्ष), मुग्धा गोळे (कार्यवाह)

**सदस्य :** प्र. म. भातखंडे , चं. ना. वझे, प्रसाद भिडे, दी. वि. कतिरा, भावना दांडेकर, इं. अ. दुडिले

**संस्कृत नाट्य प्रयोग** - २७ जुलै २०१३ रोजी 'मनस्वी संघ,पुणे' यांची निर्मिती असलेला धमाल विनोदी संस्कृत नाट्यप्रयोग ''विचक्षणोयं शान्तासूनुः'' (शांतेचे कार्टे चालू आहे) विभागातर्फे सादर करण्यात आला. रसिकांनी या प्रयोगास भरभरून प्रतिसाद दिला. कालिदास दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**व्याख्यान** - २४ ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. सौ. सीमा सोनटक्के यांचे ''मेघदूतातील सौंदर्यस्थळे'' या विषयावर मनोरंजक आणि माहितीपूर्ण व्याख्यान झाले. यामध्ये स्लाईड्‌स्‌द्वारे तत्कालीन भौगोलिक व सांस्कृतिक विषयांची माहिती देण्यात आली.

**पंडित वासुदेव आत्माराम लाटकर शास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार** - २३नोव्हेंबर २०१३ रोजी कै. पं. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्काराचे आयोजन केले होते. या वर्षी हा मानाचा पुरस्कार डॉ. श्री. मल्हार कुलकर्णी यांना संस्कृत पंडित श्री. प्रभाकर भातखंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, मानपत्र व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे औचित्य साधून यावर्षी ज्यांना कालिदास पुरस्कार जाहीर झाला आहे त्या डॉ. गौरी माहुलीकर व डॉ. संध्या पुरेचा यांचाही भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या समारंभानंतर यावर्षी राज्यनाट्यस्पर्धेत सादर होणाऱ्या ''नृत्यकूटम्'' या संस्कृत एकांकाचा मुहूर्त व रंगीत तालमीचा प्रयोग सादर केला गेला.

**संस्कृत नाटक** - या वर्षी संस्कृत राज्यनाट्यस्पर्धेत दि. २१ फेब्रुवारी २०१४ रोजी प्रभाकर भातखंडे लिखित ''नृत्यकूटम्' हा संस्कृत एकांक सादर केला गेला. या संस्कृत एकांकामध्ये वीरेश कांबळी, भाग्यश्री कुलकर्णी , मोहित वैद्य यांनी भूमिका केल्या. याचे दिग्दर्शन श्री. गुरूप्रसाद कार्लेकर यांनी केले होते. सर्व कलाकारांची कामे उत्तम झाली होती. प्रयोग उत्तमरीत्या सादर करण्यात आला.

१७ ऑगस्ट १९८५ रोजी सुरू केलेला संस्कृत रसास्वादवर्ग जोमाने चालू आहे. यावर्षी ''पातंजल योगदर्शन'' पूर्ण झाले. तसेच ''तैत्तिरीय उपनिषद्'', ''शिवमानसपूजा'', ''गुर्वष्टकम्'', ''महिषासुरमर्दिनी स्तोत्रम्'' आणि उपनिषदातील पाच बोधकथांचा रसास्वाद पूर्ण झाला. ''गंगालहरी''चा अभ्यास सुरू आहे.

मुग्धा गोळे (कार्यवाह) चं.म. कुलकर्णी (अध्यक्ष)

## जपानी भाषा शिंबिर - अहवाल

महाराष्ट्र सेवा संघातर्फे अहवाल वर्षी नवीन उपक्रम राबविला गेला तो म्हणजे जपानी भाषा शिबिरे, जपानी भाषेची तोंडओळख करून देणारे पहिले शिबिर 'चला शिकूया हसत खेळत जपानी' ६ जून ते १२ जून २०१३ या कालावधीत आयोजित केले होते. या शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला. वय वर्षे १० ते ७५ या वयोगटातील एकंदर ६७ स्त्री-पुरूष शिबिरात सहभागी झाले होते. शिबिरार्थी मुलुंडबरोबरच मुंबईच्या पश्चिम व पूर्व उपनगरातील लांबच्या ठिकाणांहून आले होते. अशाप्रकारच्या शिबिरामुळे जपानी भाषेविषयीचे कुतूहल शमवायला मदत झाल्याचे अनेकांनी सांगितले. यापुढे जपानी भाषेचे संभाषणात्मक शिबिर घ्यायचा आग्रह अनेकांनी केला.

त्यानंतर २३ ते २९ एप्रिल २०१४ या कालावधीत पुन्हा जपानी भाषेचे दुसरे प्राथमिक शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात वय वर्षे १० ते ८० या वयोगटातले २८ लोक सहभागी झाले होते. वसई, पनवेल, अंबरनाथ अशा लांबच्या ठिकाणांहून उत्साहाने हे सर्व जण शिबिरासाठी येत होते. समारोपाच्या दिवशी एम.आय.डी.सी.चे अधिकारी श्री. संदीप गोसावी यांनी शिबिरार्थीना भविष्यकाळातील जपानी भाषेतील करियरच्या संधींविषयी मार्गदर्शन केले. खास लोकाग्रहास्तव, प्राथमिक शिबिरे पूर्ण केलेल्या व्यक्तीसाठी २ मे ते ११ मे या कालावधीत संभाषण शिबिर आयोजित करण्यात आले होते. संभाषण शिबिराच्या समारोपाच्या दिवशी शिबिरार्थीनी स्वतः जपानी भाषेत लिहिलेली ४ नाटुकली सादर केली. या सर्व शिबिरांसाठी संस्थेच्या कार्यकर्त्या माधुरी पाटणकर व प्रियांका मोकाशी यांनी प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारली होती. लोकाग्रहास्तव जपानी भाषेबरोबरच इतरही परदेशी भाषांची शिबिरे आयोजित करण्याचा संस्थेचा मानस आहे.

## आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, वि. स. जोशी - कार्यवाह

**सदस्य :** र. द. लाड, वि. म. सौदागर, द.व. कुलकर्णी, वि. वा. वझे, अ. मो. भंडारे, वि. ज. जोगळेकर, प्रभाकर दामले

मागील वर्षाच्या आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशनच्या सहकार्याने मुलुंड(प.) येथे चालू असलेल्या दवाखान्याच्या जागेत भौतिक उपचार केंद्र (फिजिओथेरेपी)सुरू करण्याचे निश्चित झाल्यावर त्यानुसार दवाखान्याची दुरूस्ती व नूतनीकरण करण्यात आले. सदर नूतनीकरणाच्या खर्चाची जबाबदारी बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशनने स्वीकारली.

त्याचप्रमाणे बी.एम्.ए.एफ्. चे वसई येथे सुरू असलेल्या श्रद्धानंद रुग्णालयामधील भौतिक उपचार केंद्राला लागणारी उपकरणे त्यांनी आपल्या केंद्राकडे सुपूर्द केली आहेत.

दवाखान्याच्या नूतनीकरणानंतर दि. १ सप्टेंबर २०१३ रोजी नविन भौतिक उपचार केंद्राचे उद्घाटन बी.एम्.ए.एफ्. च्या श्रीमती भसिन मॅडम व संस्थेचे विश्वस्त म.बा. देवधर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उभय संस्थांचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. या केंद्राकरिता बॉम्बे हॉस्पिटलच्या फिजीओथेरेपी केंद्राच्या प्रमुख डॉ. लक्ष्मी चंदावरकर यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे मुलुंडमधील फिजिओथेरेपी तज्ज्ञ डॉ. रमेश यांनी आमच्या भौतिक उपचार केंद्रास तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता करून अत्यंत बहुमोलाचे सहकार्य केले आहे.

सध्या मुलुंड(प.) येथील दवाखान्यात सकाळी व संध्याकाळी दोन्ही वेळेस डॉक्टर वैद्यकीय सल्ल्यासाठी उपलब्ध असतात. भौतिक उपचार केंद्र सध्या फक्त सायंकाळी अत्यंत माफक दरात ही सेवा उपलब्ध करून देत आहे. समाजातील गरजू व सर्व वर्गातील नागरिक या सवलतीचा लाभ घेत आहेत. तेथील नागरिकांचा चांगला प्रतिसाद लक्षात घेऊन या दवाखान्यात दोन जनरल व फिजिओथेरेपीस्ट डॉक्टरांची नेमणूक करण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत मागील सहा महिन्यात जनरल डॉक्टरांकडे ३०० व फिजिओथेरपीस्ट तज्ज्ञांकडे १३५ गरजू रूग्णांनी या केंद्राचा लाभ घेतला आहे.

कर्जत येथे ओक प्रतिष्ठानच्या सहकार्याने नांगुर्ले येथील जागेत चालू असलेल्या दवाखान्याची जबाबदारी घेतलेले डॉ. घुमे व त्याचे सहकारी यांच्याबरोबर प्रत्यक्ष सभा घेऊन, आरोग्य शिबिरासाठी जागेची पाहणी करून चर्चा करण्यात आलेली आहे. डॉक्टर्स, इतर सुविधांची उपलब्धता, जागा, तेथील आजारांची माहिती या सर्वांचा आढावा घेऊन नंतरच शिबिर घेण्यात येणार आहे. येरळा मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ते करण्यात येईल.

वि. स. जोशी (कार्यवाह) र. दे. धामणकर (अध्यक्ष)

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - सुषमा पाटणकर, संपादन साहाय्य : द.व. कुलकर्णी, विनोद सौदागर, रवींद्र लाड, इंदिरा कुलकर्णी, रजनी करंदीकर, अरुण भंडारे.

महाराष्ट्र सेवा संघाच्या ७५ वर्षांच्या दमदार वाटचालीनंतर सर्वांनाच मनापासून असे वाटायला लागले की संस्थेचे एक मुखपत्र असावे, ज्यायोगे आपल्या सभासदांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचता येईल. आणि त्यातूनच निर्मिती झाली ती 'आपुलकी' या त्रैमासिकाची! सकारात्मक, विधायक व प्रेरणादायी विचारांनी परिपूर्ण अशा साहित्याने नटलेला देखणा अंक घेऊन आम्ही सभासदांच्या भेटीला जायचे ठरविले. त्यातून संस्थेला सभासदांबद्दल व सभासदांना संस्थेबद्दल असलेली आपुलकी वृद्धिंगत होण्यास मदत होत आहे हे निश्चित.

ऑगस्ट २०१३ मध्ये 'आपुलकी'च्या पहिल्या अंकाचे थाटामाटांत प्रकाशन झाले आणि त्यानंतर नोव्हेंबर २०१३ मध्ये दुसरा (दिवाळी अंक) आणि फेब्रुवारी २०१४ मध्ये तिसरा अंक वाचकांच्या भेटीला आला.

'आपुलकी'मधून सकारात्मक आणि प्रेरणादायी असे साहित्य देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आमच्या संस्थेच्या सभासदांकडूनही अशा प्रकारच्या लेखांच्या अपेक्षा आहेत. त्या त्या तिमाहीत संस्थेत घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा वृत्तांतही यांत समाविष्ट केला जातो तसेच आगामी कार्यक्रमांची सूचीही देण्यात येते.

'आपुलकी' चा प्रत्येक अंक अतिशय देखणा आहे. सर्व संपादक मंडळ, श्री. प्रदीप सप्रे, टंकलेखन करणाऱ्या ऐरोली शाखेच्या व्यवस्थापिका मेघा भावे यांच्या अतिशय तन्मयतेने केलेल्या परीश्रमातून 'आपुलकी'ची वाटचाल जोरात सुरू आहे. जाहीरातरूपाने ज्यांनी

ज्यांनी आम्हाला मदत केली आहे, त्या सर्वांचे संपादकमंडळ ऋणी आहे.

संस्थेच्या विविध स्वरूपाच्या उपक्रमांबद्दल ज्यांनी ज्यांनी कौतुकाची थाप पत्ररूपाने दिली आहे अशा पत्रांचाही समावेश 'आपुलकी'त आहे कारण पुढच्या वाटचालीसाठी आमच्यासाठी ती छानशी शिदोरी आहे.

तेव्हा आपुलकीने 'आपुलकी' वाचा!

सुषमा पाटणकर,
कार्यकारी संपादक, आपुलकी

---

## मैत्रेयी- महिला विभाग

माधवी भुसारी (अध्यक्ष), प्रियांका मोकाशी (कार्यवाह), रजनी करंदीकर(सहकार्यवाह)
सदस्य : सुषमा पाटणकर, सुषमा केतकर, सुनीता देवधर, इंदिरा कुलकर्णी, शोभा जोशी, वासंती वैद्य, सुमती खरे, नंदिनी हंबर्डे, रश्मी अनगळ

अहवाल वर्षात मैत्रेयीने उत्तमोत्तम, विविधांगी कार्यक्रम सादर करण्याचा परिपाठ यंदाही कायम राखला.

- **अक्षर मैत्री** - दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी होणारा हा कार्यक्रम म्हणजे पर्वणीच असते. या कार्यक्रमातून चर्चा-भाषण-अभिवाचन, कथाकथन; मुलाखती असे विविध कार्यक्रम होतात. यंदाही असेच चांगले कार्यक्रम केले गेले.
- **१६ एप्रिल २०१३ : वासंतिक मेळावा** - १६ एप्रिल रोजी वासंतिक मेळाव्यातील पहिला कार्यक्रम होता 'हरवलेली सावली' ही विजय मोंडकर लिखित व मयूर जाधव दिग्दर्शित नाटिका सादर करण्यात आली. सहभागी कलाकार होत्या युगंधरा वळसंगकर आणि लीना पंडित. मध्यंतरानंतरचा कार्यक्रम चित्रपती व्ही. शांताराम यांची कन्या व पंडित जसराज यांच्या सुविद्य पत्नी मधुरा जसराज यांच्या मुलाखतीचा! पत्रकार व लेखिका माधुरी ताम्हणे यांनी मधुराताईंना बोलतं केलं. गायन-दिग्दर्शन व लेखन या तिन्ही क्षेत्रात स्वतःची अशी वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण केल्याची अनुभूती श्रोत्यांना आली. या कार्यक्रमाला मैत्रिणींचा भरघोस प्रतिसाद मिळाला. रंगमंचाजवळ चैत्रगौरीची डोळ्यांचं पारणं फेडणारी आकर्षक आरास मांडली होती.
- **४ जून २०१३: मुक्तसंवाद** - मे महिन्याच्या सुट्टीनंतर जमलेल्या मैत्रिणींनी विविध विषयावर चर्चा केली. विषय होते १) पर्यावरण २) लग्ना तुझा रंग कसा ३) ऑपरेशननंतर घ्यावयाची काळजी. यावर मैत्रिणींनी आपली मते मांडली.
- **१८ जून २०१३ : भाषण** - मुलुंडच्या रहिवासी शोभा जोशी यांनी एकटीने १२५ दिवसांत जवळजवळ ३००० कि.मी. नर्मदा परिक्रमा पायी पायी पूर्ण केली. त्या दरम्यान आलेले चित्तथरारक अनुभव, परिक्रमा करण्याकरिता करावी लागणारी तयारी - ती कशाप्रकारे केली जाते इत्यादी बाबत त्यांचे माहितीपूर्ण भाषण झाले.
- **२ जुलै २०१३ : भाषण** - १ जुलै 'डॉक्टर्स डे' निमित्त पहिल्या न्याय वैद्यक चिकित्सक डॉ.वसुधा आपटे यांचे एका अगदी अनोख्या विषयावर भाषण मैत्रेयीने आयोजित केले होते. विषय होता 'न्याय वैद्यक शास्त्र - कार्य व अनुभव' न्याय वैद्यक शास्त्र म्हणजे काय ते सांगून एखाद्या संशयास्पद मृत्यूचे कारण शवचिकित्सेद्वारे कसे शोधले जाते व अपराध्याचा गुन्हा कसा सिद्ध केला जातो ह्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती वसुधाताईंनी आपल्या भाषणातून दिली.
- **१६ जुलै २०१३:** चरित्र लेखनातील पतिपत्नीच्या नात्यासंबंधी प्रतिभा गोपुजकर ह्यांनी आपले विचार मांडले. १८ - १९व्या शतकातील पतिपत्नीच्या नात्यातील धागे उलगडून दाखवताना त्यांनी अनेक उदाहरणे दिली. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्वकाळ ते आजपर्यंतच्या काळातील पति-पत्नीची नाती व त्यातील बदलांचा आढावा त्यांनी घेतला.
- **६ ऑगस्ट २०१३ :** 'आम्ही मायदेशी मुलं परदेशी' या पुस्तकाच्या लेखिका नीलिमा बोरवणकर ह्यांनी परदेशी गेलेल्या मुलांच्या पालकांच्या (२५० जणांच्या) मुलाखतींमधून पालकांना आलेले अनुभव यापुस्तकामधून मांडल्याचे सांगितले. प्रस्तुत पुस्तक म्हणजे दूरदेशी गेलेल्या मुलांच्या आईवडिलांच्या मनाचा आरसाच आहे.
- **३ सप्टेंबर २०१३ :** डॉ. प्राजक्ता देशपांडे यांचे भाषण आयोजित केले होते. विषय होता 'बाळा जो जो रे'. झोपेविषयी सर्व काही म्हणजे झोपेच्या अवस्था (गाढ/लाईट झोप, साखर झोप),निद्रानाश-झोपेत पडणारी स्वप्ने, घोरणे याबाबतीत औत्सुक्यपूर्ण माहिती पुरवून त्यावरचे उपाय व टिप्स डॉ. देशपांडे यांनी यावेळी दिल्या.

- **१७ सप्टेंबर २०१३ :** विषय देऊन आपले विचार मांडण्याच्या कार्यक्रमाचे विषय होते १) श्रद्धा व अंधश्रद्धा २) स्त्रिया व सोन्याचा हव्यास ३) सणांचे बाजारीकरण. श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्यामध्ये एक पुसटशी सीमारेषा असते. श्रद्धेच्या अतिरेकाचे रूपांतर अंधश्रद्धेत होते. आत्मविश्वासाचा अभाव असलेल्या व्यक्ती अंधश्रद्धाळू असतात तर जबरदस्त आत्मविश्वास कोणत्याही प्रकारचे काम यशस्वी करण्यास मदत करतो असे मत मांडले गेले. सोन्याचा हव्यास आणि स्त्रिया या विषयावर बोलताना सोने सरकार जमा करावे किंवा बाँडच्या स्वरूपात असावे असे म्हटले गेले. सणांचे बाजारीकरण होण्यास माध्यम आणि राजकारणी जबाबदार आहेत असे मत मांडले गेले. सर्व मैत्रिणी भरभरून बोलल्या.
- **२ ऑक्टोबर २०१३ : काव्यवाचन** - 'किचन पोएम्स' या धीरूबेन मेहतांच्या काव्य संग्रहाचा उषा मेहता यांनी अनुवादित केलेल्या काव्य संग्रहावर आधारित 'ठकीची गोष्ट' हा कार्यक्रम नंदिनी हंबर्डे व रश्मी अनगळ यांनी सादर केला. 'ठकी' हे स्त्रीचे रूपक मानून तिच्या आजी (आईची आई) ते ती स्वतः आई बनते येथपर्यंतच्या प्रवासात त्याकाळातील अंधाऱ्या स्वयंपाकघरापासून ते आताच्या मॉड्यूलर किचन पर्यंतचे बदल तसेच किचनच्या चौकटीतून ज्ञान मिळवत त्यानुसार वागणाऱ्या ठकीचा प्रवास आला आहे.
- **८ ऑक्टोबर २०१३ : शारदोत्सव** - मुलुंडमधील सर्व महिला मंडळाच्या सहकार्याने यंदाचा ५० वा शारदोत्सव साजरा केला गेला. सुषमा पाटणकरांनी आपल्या प्रास्ताविकातून शारदोत्सवाच्या ५० वर्षांच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. नंतर स्त्री शक्तीचा महिमा सांगणारा 'नारी जगाते तारी' हा पोवाडा आराधना मंडळाने सादर केला. दुसऱ्या कार्यक्रमाच्या भाषणाचा विषय होता 'शहरी स्त्री व ग्रामीण स्त्री, एक अनुबंध' वक्त्या होत्या प्रतिभा इंगोले. शहरी स्त्रीप्रमाणेच ग्रामीण स्त्रीची सुख दुःखे सारखीच असतात पण परिस्थितीत मात्र फरक असतो तसेच स्त्री ज्ञानाचे रूपक असून समाजाचा महत्त्वाचा घटक असल्याचे प्रतिपादन केले. भाषणानंतर राष्ट्रसेविका समितीच्या मैत्रिणी टिपऱ्या खेळल्या. सूत्र संचालन वैशाली घांग्रेकर यांनी केले. सहभागी सर्व कलाकारांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सहभागी मंडळे : १) आराधना म. मंडळ २) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ ३) कल्पना विहार ४) चित्पावन मंडळ ५) रूद्राणी पुरोहिता ६) राष्ट्रसेविका समिती ७) मैत्रेयी ८) रसरंजन
- **२० ऑक्टोबर २०१३: कोजागरी**- कोजागरीनिमित्त सीमा नित्सुरे आणि त्यांच्या सहकलाकारांनी सुमन कल्याणपूर यांनी गायलेल्या गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. सावळ्या विठ्ठला, चल ऊठ रे मुकुंदा ; आकाश पांघरूनी अशा अनेक मराठी गाण्यांचा मनमुराद आनंद लुटण्यात व गतस्मृतीत मैत्रिणी गुंग होऊन गेल्या. नंतर दांडिया खेळल्या. कार्यक्रमाच्याशेवटी अल्पोपाहार व मसाला दुधाचा आस्वाद घेतला.
- **१९ नोव्हेंबर २०१३ : अभिवाचन-** ८ नोव्हेंबर पु. ल. देशपांडे यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त पु.लं. बद्दल ठिकठिकाणी लिहिलेल्या लेखांचे वाचन रजनी करंदीकर, प्रियांका मोकाशी व मधुरा महंत यांनी केले. त्यातून पु.लं चे बालपण (उमाकांत देशपांडेंचा लेख) त्यांना लागलेले नाट्यवेड-संगीत-विनोदी कोटीबाजपणा, कीर्तन इ. गुणांचे दर्शन घडले.
- **४ डिसेंबर २०१३ : कथाकथन** - विज्ञान कथा, एका वेगळ्याच कथा प्रकाराच्या कथाकथनाचा कार्यक्रम स्वाती कुलकर्णी ह्यांनी सादर केला. त्यांनी डी. व्ही. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या चार विज्ञानकथा वाचून दाखविल्या.
- **१८डिसेंबर १०१३ : चर्चा** - 'दिवाळी अंकावर बोलू काही' हा विषय चर्चेसाठी होता. प्रास्ताविकात नंदिनी हंबर्डे ह्यांनी १२०० अंक रजिस्टर झाले परंतु ४०० अंकच बाजारात आल्याचे सांगितले. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी अंतर्नाद; मौज, किस्त्रीम, मेनका सारख्या अनेक दिवाळी अंकांतून दर्जेदार साहित्य (लेख) होते. अनेक अंक वाचले गेले.
- **२ जानेवारी २०१४ :अभिवाचन** -'रसज्ञ निसर्गयात्री रवींद्रनाथ' -रवींद्रनाथांचा जीवनप्रवास, साहित्यप्रवास,शांतिनिकेतन स्था-पना, त्यांच्या जीवनावर व साहित्यावर इतरांचा , विशेषतः वडील बंधूंचा प्रभाव; जगात सर्वश्रेष्ठ ठरलेल्या राष्ट्रगीत-'जन-गण-मन' ची निर्मिती इत्यादी अनेक गोष्टी या अभिवाचनातून समजल्या. त्यांच्या जीवनपटावर सुहास कराडकर यांनी; साहित्यावर नंदिनी हंबर्डे यांनी आणि सामाजिक कार्य; रवींद्र संगीत (बाऊल संगीत); शांतिनिकेन यावर रश्मी अनगळ यांनी पूर्ण आढावा घेतला.
- **२६ जानेवारी २०१४: मैत्रेयी वर्धापन दिन** - २६ जानेवारी रोजी मैत्रेयीचा २७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कै. प्रभावती पागे पुरस्कार यंदा मुलुंड (पूर्व) येथील प्रवचनकार सुनीला बापट ह्यांना सिंधुताई डांगे ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तत्पूर्वी त्यांनी या पुरस्काराची पूर्वपीठिका सांगितली. नंतर प्रवचनकार सुनीला बापट ह्यांनी सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचा मार्ग दाखविणाऱ्या विषयावर माहितीपूर्ण प्रवचन केले. दुसरा कार्यक्रम 'मराठी नाटकातील बदलते प्रवाह' हा परिसंवाद होता. सुषमा देशपांडे, वंदना खरे, संपदा जोगळेकर - कुलकर्णी यांना लीना केदारे यांनी बोलतं केलं. नाटकांचे विषय, वेळ, पात्र संख्या-नेपथ्य, नाटकांची नावे इत्यादींच्या बाबतीत तिघींनी आपापली मते मांडली. तिसऱ्या कार्यक्रमात प्रमोदिनी वडके कवळे ह्यांनी विनोदी कथेबरोबरच(क्लोन) गंभीर पण मनाला भिडणाऱ्या (खामोशी, आय् ॲम गिल्टी) कथा सांगितल्या. चौथा कार्यक्रम होता पुण्याच्या

बांधवी वाचक मंडळाने सादर केलेला 'चुकला माझा ठोका' हा कार्यक्रम. दूरदर्शनवर गाजलेल्या रमाबाई व माधवराव रानडे यांच्या जीवनावर आधारित अशा 'उंच माझा झोका' या कथेचे हे विडंबन होते.

- **४ फेब्रुवारी २०१४ : चर्चा** - डिसेंबर १३ मध्ये दिल्लीत बसमध्ये झालेल्या बलात्कार (निर्भया) आणि महिलांवर होणारे अत्याचार त्यामुळे महिलांच्या मनात उद्भवलेली असुरक्षिततेची भावना यावर एका राजकीय महिला नेत्याने केलेल्या आक्षेपार्ह विधानावर महिलांनी चर्चा केली.
- **४ मार्च २०१४ : भाषण -** ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त लोकसत्ता चतुरंगच्या कार्यकारी संपादिका आरती कदम यांचे 'स्त्री शक्तीची नवी रूपे ' ह्या विषयावर भाषण झाले. शहरी स्त्रियांच्या बरोबरीने ग्रामीण स्त्रियाही स्वत:बरोबरच समाजाला पुढे आणत आहेत हे स्त्रीच्या नव्या रूपाचे आशादायी चित्र आहे पण या२१ व्या शतकातही स्त्रीला बलात्कार, भ्रूणहत्या, अत्याचार, अवहेलना यासारख्या घटनांना सामोरे जावे लागते ही निश्चितच विचार करायला लावणारी गोष्ट आहे असे मत आरती कदम यांनी आपल्या भाषणातून मांडले.
- **१८मार्च २०१४ : भाषण**- 'मेघदूत ते फेसबुक' संदेश वहनाचा प्रवास उलगडून दाखविणाऱ्या भाषणाच्या वक्त्या होत्या प्रज्ञा भिडे. कालिदास मेघाकरवी आपल्या प्रेयसीला संदेश पाठवतो येथपासून ते आताचे ई-मेल, फेसबुकद्वारे संदेश काही सेकंदातच पोहोचतात. या व्यतिरिक्त पशु-पक्षी, प्राणी, कीटक, इतकेच नव्हे तर निसर्गसुद्धा आपल्याला संदेश देत असतो. हे सर्व संदेश कसे पोहचवतात हे प्रज्ञा भिडे यांनी उत्कंठापूर्वक व खुसखुशीत भाषेत उलगडून दाखवले.
- **१ एप्रिल २०१४ : कथाकथन/कथावाचन** -स्वलिखित कथाकथन-कथावाचनाचा कार्यक्रम मैत्रेयीतल्या मैत्रिणींनी सादर केला. एकूण पाच कथा आल्या होत्या. भाग घेणाऱ्यांची नावे व कथांची नावे - १) साक्षात्कार (मनीषा बर्वे); २) घोटाळा (मीना अत्रे) ३) मैत्र (वैशाली अभ्यंकर) ४) सौभाग्य (भाग्यश्री नूलकर) ५) एका बादलीचा प्रवास (जानकी बापट).५ पैकी ३ कथांमधून (साक्षात्कार, मैत्र, घोटाळा) स्त्रियांच्या मनाचे कंगोरे दाखवले गेले. सौभाग्य ही विज्ञान कथा होती आणि एका बादलीचा प्रवास ही विनोदी धाटणीची कथा होती कार्यक्रमाचा समारोप सुषमा केतकर यांनी केला व सहभागी कलाकारांना मार्गदर्शन केले. त्याच्या हस्ते सहभागींना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.
- **१८ एप्रिल २०१४ : वासंतिक मेळावा - दोन कार्यक्रम** १) 'दिलखुलास' हा काव्य सादरीकरणाचा खुसखुशीत रंगतदार एकपात्री कार्यक्रम सादर केला स्वाती सुरंगळीकर यांनी. २) नृत्याविष्कारातून नवरसांची अनुभूती देणारा कार्यक्रम 'रसास्वाद' , सादरकर्त्या - नृत्यांगना शेफाली पोलाडिया.
- **विशेष :- दीपावली पेठ** : **९ ऑक्टोबर २०१३ ते १३ ऑक्टोबर २०१३** या कालावधीत सुप्रसिद्ध उद्योजिका मीनल मोहाडीकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली मैत्रेयीतर्फे ५ दिवसांची दीपावली पेठ आयोजित करण्यात आली होती. एकंदर १८ विविध प्रकारचे स्टॉल्स मांडले गेले होते. त्यात वैज्ञानिक / शैक्षणिक,खेळणी, तयार रांगोळ्या. पेपर क्विलींगच्या फ्रेम्स -दागिने इत्यादींचा समावेश होता. पेठेला चांगला प्रतिसाद मिळाला.
- **शिबिर - ११ व १२ फेब्रुवारी २०१४ :** या दोन दिवशी पेपर क्विलींग (विशिष्ट कागदाच्या बारीक रूंदीच्या पट्ट्यापासून) ग्रिटींग कार्ड्स, फ्रेम्स, दागिने इत्यादीसारख्या कलात्मक वस्तू बनवण्याचे एका वेगळ्याच कलेचे शिबिर मैत्रेयीतर्फे घेण्यात आले. त्यात बोरिवली, अंधेरी, अंबरनाथ, बदलापूरपासूनच्या महिलांनी भाग घेतला होता. एकंदर २० जणींचा सहभाग होता. मार्गदर्शक होत्या माधुरी सहस्त्रबुद्धे व रेखा महाजन
- **१२ एप्रिल २०१४:** रोजी चित्पावन ब्राह्मण संघातर्फे चैत्रगौरीची आरास ही स्पर्धा घेण्यात आली होती. विषय होता माझं घर. एकूण सात स्पर्धक होते आणि गेल्या वर्षी प्रमाणेच याही वर्षी मैत्रेयीला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. चैत्रगौरीची आरास - अर्चना कामत, रश्मी अनगळ, मेधा देव, नंदिनी हंबर्डे ह्यांनी मांडली.
- **श्रुतिका व नाट्याभिनय -** पूर्वी आकाशवाणीवरून नियमितपणे सादर होणाऱ्या 'श्रुतिका' या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेच्या पुन:प्रत्ययाचा आनंद मिळाला तो विजया फाटक लिखित आणि स्वतः लेखिका विनीता नातू, मंगला तोत्रे, विनता वर्तक यांनी सादर केलेल्या 'सुखाचा मूलमंत्र'या श्रुतिकेने. डॉ. आनंदीबाई जोशी आपला जीवनपट स्वतः उलगडून दाखवीत आहेत असे सांगणारा 'एक स्वप्न पुन्हा पुन्हा' हा संवादात्मक कार्यक्रम रश्मी अनगळ व मेधा देव यांनी सादर केला.

प्रियांका मोकाशी, कार्यवाह

माधवी भुसारी,अध्यक्ष

## कला विभाग

र. द. लाड - (अध्यक्ष) अ. मो. भंडारे (कार्यवाह)
सदस्य - चं.म. कुलकर्णी, प्रदीप नाटेकर, द.व. कुलकर्णी, वि. म. सौदागर, स. श्री. पाटणकर, वि. स. जोशी, प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, सीमा केतकर, मुग्धा गोळे, श्रेयसी वझे-मंत्रवादी. सुषमा पाटणकर

सुजाण रसिकहो नमस्कार !
संस्थेचे आर्थिक वर्ष संपले. नवीन वर्षाच्या सुरूवातीला अहवालाच्या माध्यमातून सरत्या वर्षातल्या आम्ही आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा एक धावता वृत्तांत तुमच्यासाठी सादर करीत आहोत.

- **शनिवार, दिनांक १८ मे २०१३ : 'पश्चिम घाट बचाव'** आंदोलनाचे आणि त्या अनुषंगाने 'पर्यावरण आणि विकास' या संकल्पनेचे महत्त्व 'पश्चिम घाट पर्यावरण' अहवाल सादर करणारे वैज्ञानिक डॉ. माधव गाडगीळ यांनी विशद करून सांगितले. अध्यक्षस्थान श्री. सु.ना. पाटणकर यांनी भूषविले होते.
- **शुक्रवार, दिनांक १४ जून २०१३ -** ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक सामाजिक कार्यकर्ते, उत्तम संसदपटू, शतकयोगी दत्ताजी ताम्हणे यांचा, महाराष्ट्र सेवा संघ आणि व्यास क्रियेशन्सतर्फे न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. अरूण टिकेकर या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.
- **शनिवार, दिनांक १५ जून २०१३** - दैनंदिन जीवनातल्या गंभीर विषयांवर हसत खेळत गप्पागोष्टींच्या माध्यमातून मनोरंजन करणारा तसेच वेळीच अंतर्मुख करणारा 'हास्यचिंतन' हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर वझे यांनी सादर केला. कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.
- **शनिवार, दिनांक २० जुलै २०१३** - कै. गंगाबाई लक्ष्मण महाबळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'अभंगवारी' हा कार्यक्रम 'आषाढी एकादशीचे' औचित्य साधून सादर केला. सहभाग - किशोर देशमुख, तारा कन्नन, प्रदीप नाटेकर. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर वझे यांनी केले. कार्यक्रमानंतर काल्याचा प्रसाद देण्यात आला.
- **शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०१३** - डॉ. मा.गो. खांडेकर स्मृतिप्रीत्यर्थ 'एक कलाकार एक संध्याकाळ उपक्रमांतर्गत' यावर्षी साहित्यिक संध्याकाळचे आयोजन केले होते. या वर्षीच्या पुरस्काराचे मानकरी होते मान्यवर साहित्यिक चंद्रकांत खोत. यांच्याशी म.टा.चे जयंत पवार यांनी संवाद साधला.
- **रविवार, दिनांक १ सप्टेंबर २०१३** - प्रातःकालीन संगीत सभेचे आयोजन हा कला विभागाचा नवीन उपक्रम. मागील वर्षी याची सुरूवात झाली. रविवारच्या प्रातःकालीन संगीत संभेत सौ. गीता देशपांडे आणि शिरीष पाटणकर यांनी मैफल जमवली.
- **शनिवार, दिनांक ७ सप्टेंबर २०१३**- कला विभाग आणि 'इंदू एंटरप्राईजेस' यांच्या संयुक्त विद्यमाने 'पेरेंटींग' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. 'इनव्हेस्टमेंट' या रत्नाकर मतकरी यांच्या चित्रपटाच्या निमित्ताने हा परिसंवाद आयोजित वे-ल्ला होता. सुप्रिया विनोद, संदीप पाठक आणि डॉ. अरूण नाईक, मानसोपचारतज्ज्ञ यांनी यात भाग घेतला. अतुल परचुरे यांनी कार्यक्रमाचे निवेदन - सूत्रसंचालन केले.
- **२७,२८ व २९ सप्टेंबर २०१३**- पितृस्मृती व्याख्यानमाला- यावर्षीच्या व्याख्यानमालेचा विषय होता 'राष्ट्रसंत'. तीन दिवसांच्या या व्याख्यानमालेत श्री. अरविंद कुलकर्णी, मुंबई; श्री दत्ता भोसले, पंढरपूर आणि श्री. प्रकाश पाठक , धुळे या मान्यवर वक्त्यांनी अनुक्रमे समर्थ रामदास , गाडगेबाबा आणि स्वामी विवेकानंद यांचे कर्तृत्त्व आणि या महनीय संतांचे विचार व त्यांचा चरित्रपट श्रोत्यांना उलगडून दाखवला.
- **शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०१३** - 'चला सुखद पर्यटनाला'- महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रात आपल्या कर्तृत्त्वाची मोहोर उमटविणाऱ्या तसेच महाराष्ट्र सेवा संघाशी संबंधित असणाऱ्या पर्यटन क्षेत्रातल्या दोन कर्तृत्त्ववान व्यक्तींच्या लेह-लडाख व परदेश पर्यटनविषयक माहिती देणारा एक आगळा कार्यक्रम कलाविभागाने दिला. यात सहभागी होते, 'ईशा टूर्स' या मान्यवर पर्यटन कंपनीचे संचालक आत्माराम परब आणि ट्यूलिप हॉलिडेजचे श्री. दिलीप यादव. या दोघांशी संस्थेचे विश्वस्त मु. द. भुसारी आणि संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी यांनी संवाद साधला.
- **बुधवार,१६ ऑक्टोबर २०१३** - 'सिंगिंग इन सिनेमा' -भारतीय चित्रपट सृष्टीला अलिकडेच १०० वर्षे पूर्ण झाली. चित्रपट आणि संगीत यांचे नाते निदान भारतापुरते तरी अतूट आहे. किंबहुना दर्जेदार संगीत लोकाभिमुख होण्यास चित्रपट गीतांचा खूपच हातभार

लागला. संगीताचे १०० वर्षामध्ये चित्रपटसंगीताचे विविध आविष्कार आपण अनुभवले. या बदलांचा एक रंजक आढावा सुप्रसिद्ध सिनेरसिक आणि यशस्वी चित्रपट समीक्षक श्री. अशोक राणे यांनी दृकश्राव्य माध्यमातून सादर केला.

- **शनिवार, दिनांक २३ नोव्हेबर २०१३** - 'तो येतोय..आयसॉन धूमकेतू' -लोकविज्ञान संघटनेच्या सहकार्याने आयसॉन धूमकेतू संदर्भात माहिती देणारा वैज्ञानिक कार्यक्रम आपण सादर केला. तरूणांची मोजकी पण लक्षणीय उपस्थिती हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य.
- **शनिवार, दिनांक ११ जानेवारी २०१४** - 'विज्ञान आणि आपण' -आपलं रोजच जगणं आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर प्रबोधनपर व्याख्यान आपण आयोजित केले होते. वक्ते होते डॉ. हेमू अधिकारी आणि डॉ. विवेक मॉटेरो.
- **मंगळवार, दिनांक १८ फेब्रूवारी २०१४** - 'हास्यकॉर्नर'- मान्यवर हास्यचित्रकार विवेक मेहेत्रे यांचा व्यंगचित्रे आणि विनोदाने नटलेला बहारदार कार्यक्रम . मेहेत्रे यांनी ब्रशच्या माध्यमातून अर्क चित्रांचे व हास्यचित्रांचे अनेक नमुने पेश केले.
- **१० मे २०१४** रोजी विवेक साप्ताहिकाच्या सहयोगाने 'छत्रपती शिवाजी आणि सुराज्य' या अनिल दवे लिखित व दीपक जेवणे अनुवादित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झाला. या समारंभाचे प्रमुख वक्ते मा. डॉ. सच्चिदानंद शेवडे होते. तसेच अध्यक्षस्थानी मा. विवेक भागवत होते.
- **शनिवार, ३० मे २०१४** रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर, विचारांवर व काव्यांवर आधारित 'उत्सव तेजाचा-स्वातंत्र्यवीरांचा' हा सांगलीच्या स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानने कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाची संकल्पना श्री. प्रभाकर खाडिलकर यांची होती. नाट्यदिद्दर्शन मुकुंद पटवर्धन यांचे होते. सहभागी कलाकार होते, अमोल पटवर्धन, प्रज्ञा खाडिलकर, गीता खाडिलकर, मुग्धा गोखले व इतर. कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला.

अ. मो. भंडारे, कार्यवाह  र.दे. लाड, अध्यक्ष

## बालनाट्य

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे दर वर्षी बाल राज्यनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात येते. यंदा स्पर्धेचे ११ वे वर्ष होते. मुंबई केंद्रामध्ये झालेल्या प्रथम फेरीत आपल्या संस्थेचे ''जिनी मिनीची गोष्ट'' या नाटकास निर्मितीचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. तसेच दिग्दर्शनासाठी सौ.वीणा नाटेकर आणि उत्तम अभिनयासाठी मन्विता जोशी यांना रौप्य पदक मिळाले. नाशिक येथील अंतिम स्पर्धेत संस्थेच्या नाटकास तृतीय क्रमांक आणि लेखनासाठी श्री. डी.व्ही. कुलकर्णी आणि दिग्दशर्नाशाठी सौ. वीणा नाटेकर ह्यांना पारितोषिके मिळाली. कु. मन्विता जोशी हिला अभिनयाचे रौप्य पदक आणि कु. आयुष्मा तापस हिला उत्तम अभिनयासाठी प्रशस्ती पत्रक मिळाले. मनोज आचार्य यांचे दिग्दर्शनासाठी बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या या यशात संस्थेचे पदाधिकारी आणि सेवकवर्गाचा देखील मोठा वाटा आहे.

## स्वरझंकार संगीत महोत्सव

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व व्हायोलिन अकादमी पुणे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने दोन स्वरझंकार महोत्सव आजवर संपन्न झाले होते. अभिजनांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे यंदाही ३ रा स्वरझंकार महोत्सव साजरा झाला. मात्र तो दोन भागात. २१ व २२ डिसेंबर रोजी संपूर्णपणे शास्त्रीय संगीतावर आधारित अप्रतिम गायन व वादन झाले. पं. विजय कोपरकर-गायन व उस्ताद शाहिद परवेझ आणि पं. अतुल उपाध्ये ह्यांचे सतार-व्हायोलिन सहवादन ह्या आविष्कारांनी पहिला दिवस सूरमय झाला. तर दुसऱ्या दिवशी पं. उल्हास बापट त्यांचे संतूरवादन, मृणाल नाटेकर-भिडे ह्यांचे गायन आणि समारोपाला पं. हरिप्रसाद चौरसिया ह्यांचे बासरीवादन असा मंत्रमुग्ध करणारा कार्यक्रम झाला. ह्याच महोत्सवाचा उत्तरार्ध १६ फेब्रुवारी २०१४ रोजी पं. आनंद भाटे ह्यांच्या सुश्राव्य शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाच्या बहारदार सादरीकरणाने झाला.

# महाराष्ट्रातील गिर्यारोहकांचे १२ वे गिरिमित्र संमेलन

गेली १२ वर्षे सुरू असलेल्या गिरिमित्र संमेलनात वेळोवेळी आपण निसर्गाच्या प्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव गिरिमित्रांमध्ये रूजवत आहोत. त्यासाठी सुरू असलेल्या विविध प्रयत्नांना व्यासपीठ देत आहोत. उत्तराखंडमध्ये निसर्गाचे रौद्रभीषण रूप आपल्याला पाहायला मिळाले, खरंतर निसर्ग हा नेहमीच असा अनाकलनीय असतो आणि त्यामुळेच कितीही उंच उंच कडे, शिखरे यांच्यावर आरोहण करायला आपण गेलो, तरीही निसर्गावर मात करणं आपल्याला शक्य नसतं. सह्याद्रीतील पश्चिम घाटातील अधोगती, नागरीकरणाच्या झपाट्यात आपण हताशपणे पाहात आहोत, पण ते वाचवण्यासाठी जनजागृती करण्यासाठी गिर्यारोहकांनी सह्याद्रीच्या जंगलातील देवरायांचा अभ्यास करावा, जंगलांच्या प्राचीन संकल्पना, त्यातील जलस्त्रोतांची माहिती घेऊन ती संरक्षित कशी राहतील, ही संकल्पना घेऊन डॉ. उमेश मुंडले यांनी देवरायांवर विशेष सत्र संमेलनात घेतले. १२ व्या संमेलनाचे संयोजन संमेलनप्रमुखपद श्री. दिलीप लागू (लागू बंधू मोतीवाले) यांचेकडे होते. सहसंमेलनप्रमुखपद श्री. राजन बागवे यांनी सांभाळले.

संमेलनाचे अध्यक्ष श्री. सदानंद दाते पोलिस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) मुंबई यांनी भूषविले. उद्‌घाटक होते श्री. कुमार केतकर- मुख्य संपादक, 'दिव्य मराठी', दैनिक भास्कर ग्रुप, सन्माननीय अतिथी - राजीव खांडेकर, कार्यकारी संपादक 'ए.बी.पी. माझा', दूरदर्शन हे होते. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गिर्यारोहक स्वित्झर्लंडचे श्री. एली शेविओ संमेलनासाठी आले होते. त्यांचा अतुल्य गिरिमित्र सन्मान देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर

- गिरिमित्र जीवन गौरव सन्मान - श्री. आनंद पाळंदे,
- गिरिमित्र जीवन गौरव सन्मान (मरणोत्तर) - कै. श्रीकांत लागू,
- गिर्यारोहक सन्मान - श्री. जयंत नाखवा,
- गिर्यारोहक सन्मान (मरणोत्तर) - कै. रमाकांत गुरव,
- गिरिभ्रमण - संस्थात्मक कार्य सन्मान - श्री. राजन देशमुख,
- गिरिभ्रमण - संस्थात्मक कार्य सन्मान - श्री. प्रकाश वाळवेकर,
- गिरिभ्रमण - संस्थात्मक कार्य सन्मान - श्री. गिरीश टकले
- गिरिमित्र सामाजिक कार्य सन्मान (संस्थात्मक) - पिनॅकल क्लब
- गिरिमित्र प्रस्तरारोहक पुरस्कार - श्री. महादेव गायकवाड
- गिरिमित्र कै. शरद ओवळेकर स्मृति सन्मान - पल्लवी वर्तक

**गिर्यारोहण मोहीम यशस्वी पुरस्कार** - मियार व्हॅली एक्सपीडेशन असे पुरस्कार देऊन काही विशेष सन्मानही व्यासपीठावरून दिले गेले, त्यात प्रामुख्याने -

- पुण्याच्या गिरिप्रेमी संस्थेने ल्होत्से एव्हरेस्ट २०१३ या पहिल्या नागरी मोहिमेस
- प्रियंका मोहिते - एव्हरेस्टवर यशस्वी आरोहण करणारी महाराष्ट्रातील चौथी महिला.
- डॉ. मुराद लाला - एव्हरेस्टवर यशस्वी आरोहण करणारे पहिले भारतीय डॉक्टर
- सागरमाथा गिर्यारोहण संस्था , पिंपरी - एव्हरेस्ट आरोहण २०१२

दरवर्षीप्रमाणे छायाचित्रांच्या व यशस्वी मोहिमांच्या फिल्म्सच्या स्पर्धा झाल्या. यंदाही दृक्‌श्राव्य, छायाचित्रण, ट्रेकर्स ब्लॉग, प्रश्न मंजूषा इत्यादी विविध कार्यक्रम झाले.

संमेलन यशस्वी करण्यासाठी पिनॅकल क्लब, चक्रम हायकर्स, गिरीविहार, ट्रेक क्षितिज, यंग झिंगारो, नेचर्स लव्हर्स, निसर्ग मित्र, युथ हॉस्टेल्स, शैल भ्रमर, यशवंती हायकर्स, ऑफ बीट सह्याद्री संस्था सहभागी झाल्या होत्या.

अरूण भंडारे ,कार्यवाह

रवींद्र लाड, अध्यक्ष

## अर्थ विभाग

डॉ. अ.प्र. फडणीस (अध्यक्ष), वि. वा. वझे (कार्यवाह)

**सदस्य** - अ. प. गोळे, वि. स. जोशी, अमिता ठोसर, प्रकाश सडेकर ,अजित करंदीकर, विनय देसाई

अर्थ विभागाचे हे ५ वे वर्ष. अवघे जन अर्थसाक्षर करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन अर्थविभागाची स्थापना २००९ साली झाली. आतापर्यंतच्या सरत्या वर्षांवर नजर टाकली, अथवा सिंहावलोकन केले असता सहजच जाणवतं की अर्थविभागाच्या या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. २०१३/१४ च्या वर्षाची सुरूवात झाली आयकर विवरणाच्या कार्यक्रमाने. सी.ए. संजीव गोखले यांनी विवरणपत्राबद्दल विस्तृत माहिती दिली. हा कार्यक्रम शनिवार, दिनांक ८ जून २०१३ रोजी झाला. यंदा दोन नवीन उपक्रम सुरू करण्यात आले. १)अर्थप्रबोधन, २) उद्योजक सन्मान.

- **शनिवार, २१ सप्टेंबर २०१३** - फसव्या मृगजळी योजनांचे वास्तव आणि माहिती अधिकार कायदा, सुयोग्य वापर आणि तंत्र या दोन विषयांवर व्याख्यान आयोजित केले होते. निवृत्त पोलिस अधिकारी रवींद्र भिडे यांनी फसव्या मृगजळी योजनांसंदर्भात माहिती दिली तर मिलिंद गायकवाड यांनी माहिती अधिकार कायद्याविषयी सांगितले.
- **रविवार, २४ नोव्हेंबर २०१३** - अर्थमित्रांच्या अर्थ जाणिवा समृद्ध करण्यासाठी, अर्थ, कायदा विषयक अशा त्यांच्या शंका दूर करण्यासाठी एक व्याख्यानमाला आयोजित करावी असे अर्थविभागाने ठरविले. 'महाराष्ट्र टाईम्स'ने यासाठी माध्यम प्रायोजकत्त्व देण्याचे मान्य केले. या सर्व प्रयत्नातून 'अर्थ प्रबोधन'व्याख्यानमाला सुरू झाली या मालिकेतले वरील आपल्या सर्व अर्थमित्रांना या व्याख्यानांचा लाभ घेता यावा या हेतूने दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सकाळी १० ते १२ या वेळात ही व्याख्याने आयोजित करण्यात येतात. 'स्थावर मालमत्तेवरील भांडवली नफा' (कॅपिटल गेन्स) या विषयावर पहिले पुष्प सी.ए. चंद्रशेखर वझे यांनी गुंफले.
- **रविवार,२२ डिसेंबर २०१३** -अर्थ प्रबोधन व्याख्यानमाला पुष्प दुसरे विमातज्ज्ञ प्रा. क्षितिज पाटूकले यांनी विम्याचे वेगवेगळे पर्याय, दावे आणि तक्रारींचे निवारण या आणि अशा अनेकविध विषयांवर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विमातज्ज्ञ डॉ. श्रीकृष्ण कर्वे होते.
- **रविवार, ५ जानेवारी २०१४** - गणेश केशव करंदीकर उद्योजक सन्मान सोहळा - अर्थविभागाने या वर्षात सुरू केलेला हा एक नवीन अभिनव उपक्रम मुलुंड तसेच आजूबाजूच्या परिसरातील यशस्वी मराठी उद्योजकांची ओळख मुलुंडवासीयांना व्हावी, त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाबद्दल सन्मान व्हावा, त्यांचे मार्गदर्शन तरूणांना लाभावे या हेतूने अर्थविभागाने एक उद्योजक सन्मान सोहळा प्रतिवर्षी आयोजित करण्याचे ठरविले. प्रतिवर्षी तीन मराठी उद्योजक ज्यांना सामाजिक भान आहे, ज्यांच्या सामाजिक जाणिवाही प्रगल्भ आहेत अशांना निवडून त्यांना सन्मानित करणे हा पुरस्काराचा उद्देश. अर्थविभागाच्या या पुरस्काराला मुलुंडमधील मान्यवर विकासक कायदेतज्ज्ञ श्री. अजित करंदीकर यांनी प्रायोजकत्त्व देण्याचे मान्य केले. त्यांचे वडील कै. गणेश केशव करंदीकर यांचे नाव या पुरस्काराला असावे असे ठरले. पहिलाच पुरस्कार मुलुंडमधील उद्योजक श्री. किरण देशमुख, नंदकिशोर नेमाडे आणि हेमंत रणदिवे यांना देण्यात आला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्री. अशोक पानवलकर उपस्थित होते. या उद्योजकांशी अर्थविभागाचे अध्यक्ष डॉ. अभिजित फडणीस यांनी संवाद साधला.
- **रविवार, २६ जानेवारी २०१४** - आर्थिक प्रबोधन व्याख्यानमाला 'पुष्प तिसरे' बॅंकिंग क्षेत्रातील अफरातफर, कारणे आणि उपाय या विषयावर कॅनरा बॅंकेतले निवृत्त उच्चपदस्थ अधिकारी श्री. प्रकाश सडेकर यांनी श्रोत्यांना मार्गदर्शन केले.
- **रविवार, २३ फेब्रुवारी २०१४** - अर्थप्रबोधन व्याख्यानमाला पुष्प चौथे अर्थक्रांती प्रतिष्ठानचे श्री. यमाजी मालकर यांनी कर आकारणीत सुटसुटीतपणा यावा या हेतूने एक अभियान सुरू केले आहे. या अर्थक्रांती संदर्भात श्री. मालकर यांनी श्रोत्यांपुढे आपले विचार विस्तृतपणे मांडले.
- **रविवार, २३ मार्च २०१४** - अर्थप्रबोधन व्याख्यानमाला पुष्प पाचवे सामान्य माणूस, दैनंदिन जीवन आणि कायदा या विषयावर निवृत्त पोलीस अधिकारी श्री. रविंद्र भिडे यांनी मार्गदर्शन केले.
- **रविवार,२७ एप्रिल २०१४** - अर्थप्रबोधन व्याख्यानमाला पुष्प सहावे 'भारताचे अर्थकारण वेध भविष्याचा' या विषयावर नामवंत अर्थतज्ज्ञ आणि विश्वस्त डॉ. अभिजित फडणीस यांनी आपले विचार मांडले. भारतीय अर्थव्यवस्थेची अनेक रूपे तसेच स्वातंत्र्योत्तर काळात अर्थव्यवस्थेत झालेली स्थित्यंतरे आणि अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने त्यांनी सोप्या भाषेत विशद करून सांगितली.

- **रविवार,१८ मे २०१४** रोजी 'महाराष्ट्र सेवा संघ, परिवर्तन एक बदल आणि कर्तव्य फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मी उद्योजक होणारच' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मार्गदर्शन करण्यासाठी श्री. सुरेश हावरे, श्री. रवींद्र प्रभुदेसाई, श्री. विवेक मेहेत्रे व पवन अग्रवाल हे होते. या कार्यक्रमाला अर्थरसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कार्यक्रम प्रमुख होते श्री. नीलेश मोरे तर सूत्रसंचालन केले समीरा गुजर-जोशी यांनी.
- **रविवार, २५ मे २०१४** रोजी 'गुंतवणूक अर्थकारण, त्यात निवडणुकीनंतर होणारे बदल' या विषयावर नामवंत अर्थतज्ज्ञ डॉ. अभिजित फडणीस यांनी आपले विचार मांडले.

वि. वा. वझे (कार्यवाह) डॉ. अ.प्र. फडणीस (अध्यक्ष)

## साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

द. व. कुलकर्णी -अध्यक्ष, नंदिनी हंबर्डे -कार्यवाह, सुषमा पाटणकर–सहकार्यवाह

**सदस्य**

अ. मो. भंडारे, र. द. लाड, स. ग. पोतदार, वि. म. सौदागर , सुनीता देवधर, सुहास कराडकर, इंदिरा कुलकर्णी, मेधा देव

महाराष्ट्र सेवा संघाच्या न. चि. केळकर ग्रंथालयाचा २०१३-२०१४ या वर्षाचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. कारण ग्रंथालय ३५ वर्षाची यशस्वी वाटचाल पूर्ण करून ३६ व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्याबद्दल सर्व रसिक वाचकांचे अभिनंदन आणि हे वर्ष नवनव्या पुस्तकांच्या वाचनानंदात जाओ ही शुभेच्छा! पुस्तके असे मित्र असतात की जे रूसत नाहीत, भांडत नाहीत, अबोला धरत नाहीत, मानापमानाच्या भोवऱ्यात अडकत नाहीत, काही मागतही नाहीत. फक्त त्यांची पानं आणि आपली मनं उघडी असली की पुरे! वाचनाचा आनंद हा एकाच वेळी मनाला व आत्म्याला होणारा आनंद आहे. गेल्या वर्षभरातच सादर केलेल्या सर्वच सांस्कृतिक कार्यक्रमातून देखील हा आनंद वाचकांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संपूर्ण वर्षात (२०१३-२०१४) ग्रंथालयातर्फे सादर केलेले कार्यक्रम-

- **दि. ८ एप्रिल २०१३** , शांताबाई शेळके याच्या समग्र साहित्याविषयी अभ्यासपूर्ण कार्यक्रम - सादरकर्त्या मैत्रेयी केळकर, युगंधरा वळसंगकर व किशोरी वाणी
- **दि. २३ एप्रिल २०१३** जागतिक पुस्तक दिन - प्रसिद्ध नाटककार शेक्सपिअर यांच्या जन्मदिनी पुस्तक दिन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने नंदिनी हंबर्डे यांनी 'वाचन संस्कृती' या विषयावर आपले विचार मांडले.
- **दि. २६ ते २९ एप्रिल २०१३,** वसंत व्याख्यानमाला - न.चिं. केळकर ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय - मुलुंड विभाग व ग. क. खांडेकर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम केला जातो. या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या विषयांवर 'विरंगुळा केंद्र, मुलुंड(पू) येथे व्याख्याने झाली. १)'प्रकृतीच्या गमती-जमती' - डॉ. आशुतोष गोवारीकर. यावेळी थोर स्वातंत्र्य सैनिक श्री. दत्ताजी ताम्हणे अध्यक्षस्थानी होते. २) 'मराठी संतकवयित्री' - श्री. अरविंद दोडे ३) 'मला भेटलेली माणसे'- श्री. रविप्रकाश कुलकर्णी व ४) 'बदलता ग्रामीण भारत'- श्री. प्रदीप लोखंडे
- **दि. ५ मे २०१३** , बालमैफल - दुपारी १ ते ६ या वेळात वय वर्षे ५ ते १४ या गटातील मुलांसाठी हा उपक्रम केला गेला. त्यासाठी 'व्यास क्रियेशन' यांचे सहकार्य लाभले. यामध्ये मुलांना खेळ, गाणी, हस्तकला, चित्रकला इत्यादी शिकविण्यात आले. एकूण ८४ मुलांनी भाग घेतला. मुलांना खाऊ व बालसाहित्याची पुस्तके वाटण्यात आली. डॉ. मनीषा बर्वे व ग्रंथालय समिती सदस्या यांच्या सहकार्याने अत्यंत उत्साहात बालमैफल रंगली व त्यानिमित्ताने मुलांना वाचनाकडे वळविण्याचा एक प्रयत्न केला गेला.
- **२७ ऑगस्ट २०१३** , सेतुमाधवराव पगडी स्मृती व्याख्यानमाला -'कैलास लेण्याचे शिल्पवैभव' या विषयावर श्री. वि. ह. भूमकर यांचे भाषण झाले.
- **दि. २८ ऑगस्ट २०१३** , गंगाधर गाडगीळ गौरव पुरस्कार- पॉप्युलर प्रकाशनतर्फे अहवालसाली हा पुरस्कार श्री. राजीव नाईक यांना त्यांच्या, 'लेखनातील प्रयोगशीलते'साठी दिला गेला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. विजया राजाध्यक्ष अध्यक्षपदी होत्या.
- **दि. २० नोव्हेंबर २०१३,** 'पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी' - अमेरिकास्थित श्रीमती नंदिनी पंड्या यांनी 'आपल्याला आनंदीबाईंवर अभ्यास का करावासा वाटला' यावरील त्यांचे विचार मांडले. डॉ. आनंदीबाईंच्या दुर्मीळ पत्रांचे त्यांनी संकलन केले आहे.
- **दि. १ डिसेंबर २०१३,** 'अक्षरयोगी' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा -श्री. अनंत अंतरकर यांचेवरील 'अक्षरयोगी' हे पुस्तक

महाराष्ट्र सेवा संघाचे माजी विश्वस्त श्री. वसंतराव केतकर यांना अर्पण करण्यात आले. त्याप्रसंगी लेखक व कवी श्री. प्रवीण दवणे व सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री आशा काळे यांनी पुस्तकाबद्दलचे व त्या अनुषंगाने अंतरकरांबद्दलचे मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी श्री. उदय निरगुडकर होते.

- **दि, १५ फेब्रुवारी २०१४,** श्रीमंत महाराणी अहिल्याबाई होळकर साहित्य संमेलन आणि ग्रंथप्रकाशन - अहिल्याबाईंवरील तीन ग्रंथांचे प्रकाशन , त्यांच्यावरील साहित्यावर चर्चा, त्यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. हे एकदिवसीय संमेलन 'अहिल्याबाई होळकर प्रतिष्ठान'- इंदूर यांच्या सहकार्याने पार पडले. यावेळी श्रीमंत महाराणी उषाराजे आपल्या परिवारासह उपस्थित होत्या.
- **दि. २४ ते २६ फेब्रुवारी २०१४ ,** प्रिय रसिक - वर्ष ५ वे. पॉप्युलर प्रकाशनाच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे हा कार्यक्रम सादर केला गेला. या अंतर्गत १) 'द लिव्ह वेल डाएट' या डॉ. सरिता डावरे व मास्टर शेफ संजीव कपूर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रमुख पाहुणे प्रख्यात अभिनेते पद्मश्री परेश रावळ, गायक हरिहरन व डॉ. अविनाश फडके उपस्थित होते आणि मुलाखतकार अभिनेत्री स्वरूप संपत होत्या. २) इंदिरा संत याच्या 'गर्भरेशमी' या काव्यसंग्रहावर आधारित कवितांचे वाचन डॉ.अनुपमा उजगरे व प्रा. उषा परब यांनी केले. ३) 'ब.बळीचा' या कादंबरीवर आधारित लेखक श्री. राजन गवस यांची मुलाखत. मुलाखतकार डॉ. अरूणा दुभाषी. सर्व कार्यक्रमांना श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.
- **दि. २७ फेब्रुवारी २०१४, मराठी भाषा गौरव दिन** - संस्थेचे अध्यक्ष चं. ना. वझे व श्रेयसी वझै-मंत्रवादी यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांवर कार्यक्रम सादर केला. श्री. वझे यांनी मराठी शुद्धलेखनाचे महत्त्वाचे नियम रंजकपणे समजावले.
- **दि. ८ मार्च २०१४,** साहित्य साधना पुरस्कार - वर्ष ९ वे- सिनेपत्रकारिता या विषयासाठी 'बाबू मोशाय'(श्री. हेमंत देसाई) यांच्या 'बॉम्बे टॉकीज' या पुस्तकाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी विश्वास पाटील होते व मुलाखतकार- अमोल परचुरे.
- **वाचक संवाद** - दर सोमवारी सायंकाळी ६ ते ७ या वेळात होणाऱ्या या उपक्रमात नवीन पुस्तकांवर चर्चा, काव्यवाचन, कथाकथन, उल्लेखनीय लेख-पुस्तके इत्यादींबाबत मतप्रदर्शन होत असते. यामधील कांही खास कार्यक्रम - **१) दि. १ ऑगस्ट २०१३**- 'क्रांती आणि हरितक्रांती'-पांडुरंग सदाशिव खानखोजे या पुस्तकावर पत्रकार श्री. सुहास फडके यांचे विचार **२) दि. ३ जून २०१३** -'जपान प्रवास एक आनंदानुभव' - प्रियांका मोकाशी आणि माधुरी पाटणकर. **३) दि. २७ ऑगस्ट २०१३**- लेखक आपल्या भेटीला 'पुस्तक उघडलं' या पुस्तकाच्या लेखिका सुनिता शिंदे यांची ओळख व त्यांचे मनोगत. प्रमुख पाहुणे मंदार फणसे व मीनल मोहाडीकर. **४) दि. २४ मार्च २०१४** - दिवाळी अंक वाचून वाचकांनी लिहिलेल्या वह्यांवर चर्चा व सर्वोत्तम ३ वह्यांना बक्षिसे देण्यात आली. वाचकांकडून या उपक्रमाला खूपच चांगला प्रतिसाद मिळत आहे.

वरील सर्व कार्यक्रमांचा लाभ आमच्या वाचकांनी घेतलाच पण काही वाचकांनी दिलेल्या देणग्यांचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे जरूरीचे आहे. श्री. यशवंत अनंत केळकर यांनी आपली पत्नी निशा केळकर यांच्या स्मरणार्थ ग्रंथालयासाठी महाराष्ट्र सेवा संघाच्या नावे रू. १ लाखाचा धनादेश देणगी स्वरूपात एप्रिल २०१३ मध्ये दिला. त्या व्याजातून दरवर्षी पुस्तके घेण्यात येतील तसेच वर्ष २०१३-२०१४ करिता त्यांनी स्वतंत्रपणे रू. १०,०००/- पुस्तक खरेदीसाठी दिले. याशिवाय गजानन गोरे यांनीही रू. ५०,०००/- संस्थेला दिले असून त्याच्या व्याजातूनही प्रतिवर्षी रू. ५ ते ६ हजाराची पुस्तके घेतली जातात. या सर्व ग्रंथालय देणगीदारांचे आम्ही आभारी आहोत.
महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त , कार्यकारी मंडळ, सभासद आणि ग्रंथालयाच्या वाचकांकडून व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत!

| | |
|---|---|
| नंदिनी हंबर्डे | द.व. कुलकर्णी |
| कार्यवाह | अध्यक्ष |

**अभिप्राय :**
महाराष्ट्र सेवा संघ ग्रंथालय बघून अतिशय आनंद व समाधान वाटले. त्यातील कार्यकर्ते व सभासदांना शुभेच्छा.
.....डॉ. सरीता डावरे

## दृष्टिसेवा अभ्यासिका

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संचालित न.चिं.केळकर ग्रंथालय व नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जुलै, २०१२ रोजी सुरू केलेल्या दृष्टीसेवा अभ्यासिका या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. पहिल्याच वर्षीचा दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागल्यामुळे सर्व शिक्षकांचे व कार्यकर्त्यांचे मनोबल वाढले आहे.

यावर्षीपासून सोमवार, मंगळवार, बुधवार व शनिवार असे चार दिवस सकाळी १०.३० ते ४.३० वाजेपर्यंत दृष्टिसेवेचे वर्ग सुरू करण्यात आले. सुरवातीला १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. जुलै महिन्यात आणखी ३ विद्यार्थ्यांनी व ऑगस्टमध्ये ५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यामुळे विद्यार्थी संख्या २५ झाली. यावर्षीपासून बेकरीबरोबरच संगीत हा ऐच्छिक विषय विद्यार्थ्यांना देण्यात आला. सप्टेंबर महिन्यापासून नॅबच्या मानखुर्द सेंटरमधील एक विद्यार्थिनी संगीत शिकण्यास येत होती . त्यामुळे २०१३-२०१४ या शालेय वर्षासाठी २६ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. त्यापैकी २० विद्यार्थी मार्च २०१४ च्या १०वीच्या परीक्षेला बसले होते व ते सर्व उत्तमरीत्या उत्तीर्ण झाले.
या शैक्षणिक वर्षात एकूण २० मानद शिक्षकांनी आपला अमूल्य वेळ देऊन अध्यापनाची जबाबदारी उचलली. विद्यार्थ्यांच्या स्वाध्याय व प्रयोगवह्या लिहिणे तसेच परीक्षेच्यावेळी लेखनिक म्हणूण २५ लेखनिकांनी मोलाची मदत केली. बेकरी बरोबरच सायन्स प्रॅक्टीकल्स-साठीही शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांसाठी ४ संगणक देणगी म्हणून मिळाले आहेत त्यामध्ये दृष्टिबाधित विद्यार्थीदेखील शनिवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत संगणक शिक्षणाचा लाभ घेत आहेत. बोर्डाच्या संगणक या विषयाच्या परीक्षेसाठीही या केंद्राचा उपयोग करण्यात आला.

प्रथम सत्र परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात आली. फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या पूर्व-परीक्षेसाठी बोर्डाच्या नियमानुसार नववीच्या विद्यार्थ्यांनी लेखनिक म्हणून काम केले. यासाठी मुलुंड पूर्व येथील वामनराव मुरांजन शाळेने चांगले सहकार्य दिले. विद्यार्थ्यांनी विनायक बेकरीला भेट देऊन बेकरी व्यवसायाची माहिती करून घेतली. ऑगस्टमध्ये मुरबाड जवळील टोकावडे या ठिकाणी २१ विद्यार्थी व १६ मार्गदर्शक सहलीसाठी गेले होते. ही सहल विनायक बेकरीने आयोजित केली होती. केद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठी दिवाळी फराळ पार्टी आयोजित करण्यात आली होती. प्रायोगिक तत्त्वावर दोन दिवस मुलांसाठी सकाळचा नाश्ता हा उपक्रम राबविण्यात आला होता.
दृष्टिसेवा केंद्रासाठी यावर्षी ५५ देणगीदारांकडून एकूण रू. २,५५,२५२/- देणगी जमा आहे.या देणगीचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, आहार, साहित्य, गरजवंतांसाठी प्रवासखर्च व इतर सुविधा पुरविण्यासाठी केला जातो. जेणेकरून संस्थेमधील त्यांचा दिनक्रम व शिक्षण सुखकर व्हावे.

रश्मी अनगळ , कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

## विज्ञान विभाग

अध्यक्ष - द.व. कुलकर्णी , कार्यवाह - स. श्री. पाटणकर
सदस्य - सीमा केतकर

महाराष्ट्र सेवा संघाच्या नव्याने स्थापण्यात आलेल्या स्वतंत्र विज्ञान विभागाचा पहिला वहिला कार्यक्रम ''विज्ञानकथा वाचन /कथन'' दि. १२ एप्रिल २०१४ रोजी विज्ञानप्रेमींच्या उत्साही प्रतिसादाने संपन्न झाला. आत्तापर्यंत विज्ञानविषयक कार्यक्रम कला विभागाच्या अंतर्गत आयोजित केले जात होते. परंतु विज्ञान प्रसाराची वाढती गरज लक्षात घेऊन आणि विशेषतः युवा पिढीचा वाढता सहभाग मिळण्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू केला. स्मिता पोतनीस, शरद पुराणिक आणि कॅ. सुनीत सुळे या कथाकारांनी आपापल्या एका कथेचे वाचन केले व या कथांच्या अनुषंगाने 'विज्ञानकथा' या विषयावर अतिशय रंजक चर्चा झाली.
१७ मे २०१४ रोजी विज्ञान विभागाचा दुसरा कार्यक्रम होता. 'गणिताची वैज्ञानिक ओळख' या विषयी डॉ. शशिकांत फाटक यांचे व्याख्यान अतिशय उद्बोधक झाले. या कार्यक्रमाला युवकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

# ज्ञानेश्वर पुस्तक पेढी

आर्थिक दृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांच्या स्वरूपात मदत करण्याचे कार्य यावर्षीही महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड या आपल्या संस्थेने सुरू ठेवले आहे. याचाच भाग म्हणून संस्थेने २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मुलुंड येथील विद्यार्थ्यांसाठी ९ वी चे २७ आणि १० वी चे ८१ विद्यार्थी एकूण १०८ जणांना रू. ३०,००५/- किंमतीची शालेय पुस्तके खरेदी करण्यात आली. तसेच नांगुर्ले येथील आदिवासी पाड्यातील ९ वी १० वी च्या गरजू विद्यार्थ्यांना २१,९२६/- किंमतीचे प्रत्येकी २०/२० संच देण्यात आले.

प्रदीप वाईकर, उमेश काणेकर ,सेवक — अलका चौधरी, ग्रंथपाल

---

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ६५१ | ४६६ | १११७ |

३१-३-२०१४ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३३,३१९

अहवाल वर्षात १,१६,७५४/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

| **३१-३-२०१४ अखेर सभासद** | विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग |
|---|---|---|---|
| | १६५ | ५६ | ६२५ |
| | अंक विभाग | सन्माननीय सदस्य | एकूण सदस्य |
| | २१४ | ३ | १०६३ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके |
|---|---|---|---|---|
| मराठी | ६४ | ११ | ३ | १२ |
| हिंदी | ८ | - | ४ | - |
| इंग्रजी | ३२ | - | १२ | ११ |
| एकूण | १०४ | ११ | १९ | २३ |

**दिवाळी अंक योजना २०१३-१०१४**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | २३० |
| अंकाचे प्रकार | १०७ |
| अंकांच्या एकूण प्रती | २७१ |
| खरेदी किंमत रुपये | २१,२६४/- |

''**ग्रंथ तुमच्या दारी**'' हा एक अभिनव उपक्रम कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिकच्या सहकार्याने महाराष्ट्र सेवा संघाने सुरू केला. ग्रंथालयापर्यंत न पोहोचणाऱ्या ज्येष्ठ तसेच इतर वाचकांची वाचनाची भूक काही अंशी तरी पूर्ण व्हावी हा यामागचा उद्देश. २० ग्रंथपेट्यांचे वितरण केले आहे. या २० पेट्यांच्या माध्यमातून २००० पुस्तकांच्या मदतीने संस्थेने साधारणपणे ६०० वाचकांना ''वाचते'' केले आहे.वाचन संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी संस्थेने सुरू केलेल्या या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | ११ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, रत्नागिरी टाईम्स, सनातन प्रभात, प्रहार |
| हिंदी | २ | नवभारत टाईम्स, नवभारत |
| इंग्रजी | ७ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्री प्रेस जर्नल, इकॉनॉमिक टाईम्स, एशियन एज, हिंदुस्थान टाईम्स, डी.एन्. ए. |
| गुजराथी | २ | मुंबई समाचार, गुजराथी समाचार |

**सायंदैनिके**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | २ | महानगर, संध्यानंद |
| हिंदी | १ | सामना |
| इंग्रजी | २ | आफ्टरनून, मिड-डे |

## ऐरोली शाखा

डॉ. आ. रा. कट्टी - अध्यक्ष , श्री. प्र. र. सप्रे - उपाध्यक्ष, श्री. शं. गो. वीरकर - कार्यवाह, श्री. कि. म. पेंढरकर -कोषाध्यक्ष, **सदस्य :** श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध), श्री. प्र. श्री. नाटेकर (पदसिद्ध) , श्री. मु. शं. बालंखे , श्री. अ. रा. दाभोळकर, श्री. वि. दा. जगताप, सौ. सुनीता देवधर, सौ. दर्शना निमसे, श्री. निनाद जोशी व श्री. सुधीर बागाईतकर

नमस्कार!

२००१ साली ऐरोली शाखेची स्थापना झाली आणि गेल्या १३ वर्षांत संस्था इथे रुजली, वाढली आणि केवळ ऐरोलीतच नव्हे तर नवी मुंबईत नावारूपास आली. जनमानसामध्ये या वास्तूची ओळख केवळ लग्नाचे सभागृह म्हणून नाही तर सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्य करणारी एक अग्रगण्य संस्था म्हणून आहे. गेल्या १३ वर्षांत झालेल्या संस्थेच्या प्रगतीत ३ अध्यक्ष (श्री. देवधर, श्री. धामणकर व डॉ. कट्टी) व माजी कार्यवाह व सध्याचे उपाध्यक्ष श्री. प्रदीप सप्रे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी ऐरोलीतील जनसामान्यांशी दांडगा जनसंपर्क व लोकसंग्रह प्रस्थापित केला आणि त्याचा लाभ संस्थेला होतो आहे आणि यापुढेही होत राहील याची खात्री वाटते.

कुठलीही संस्था सर्जनशील कार्यकर्त्यांच्या योगदानावर चालत असते. कार्यकारिणीच्या मोजक्याच सभासदांवर कामाचा भार पडू नये आणि त्याचबरोबर नवीन विचारांना वाव मिळावा या हेतूने कार्यकारिणीमध्ये यावेळी ४ नवीन चेहऱ्यांचा समावेश करण्यात आला. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून ऐरोली शाखेची वाटचाल उत्तम प्रकारे सुरू आहे.

वर्षभरात वेगवेगळ्या विभागांकडून सुमारे ३५ नावीन्यपूर्ण व दर्जेदार कार्यक्रम सादर झाले. या वर्षाची सुरुवात वर्धापनदिनाने झाली. ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या स्मृतीला सूरमयी मानवंदना देणाऱ्या या कार्यक्रमात खेबुडकरांची वेगवेगळ्या ढंगांची व बाजाची गाणी सादर करण्यात आली. 'गुणवंत विद्यार्थी सत्कार व ज्येष्ठ शिक्षक सन्मान सोहळा' हा कार्यक्रम नेहमीच्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला नवी मुंबई महानगरपालिकेचे नगर अभियंता श्री. मोहन डगांवकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'दिवाळी पहाट' च्या कार्यक्रमात झी.टी.व्ही. सारेगमपा फेम अनुजा वर्तक व सहकलाकारांनी मराठी गाणी व शास्त्रीय गायनावर आधारित हिंदी गीते सादर केली. वर्धापनदिन व दिवाळी पहाट च्या कार्यक्रमांना नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळतो. नव्या पिढीमध्ये शास्त्रीय गायनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वर्षभरात शास्त्रीय गायनाचे काही कार्यक्रम सादर करण्याचा संस्थेचा विचार आहे. वेगवेगळ्या विभागांतर्फे सादर होणाऱ्या कार्यक्रमांसाठी ध्वनियंत्रणा भाड्याने आणावी लागते. त्याऐवजी आपली स्वतःची उत्तम व दर्जेदार ध्वनियंत्रणा असावी असा विचार करून एका उत्कृष्ट ध्वनियंत्रणेची यावर्षी खरेदी करण्यात आली.

ऐरोली शाखेचे सर्वच विभाग उत्तम काम करीत असून, त्यांचे स्वतंत्र अहवाल सोबत जोडले आहेत. मैत्रीतर्फे वर्षभर स्त्रियांचे व्यक्तिमत्त्व फुलवणारे उपयुक्त कार्यक्रम सादर केले जातात. डिसेंबर २०१४ मध्ये मैत्रीच्या स्थापनेला १० वर्षे पूर्ण होत आहेत . कला

विभागातर्फेदेखील, केवळ टी.आर.पी. वर लक्ष न देता, जे उत्तम आहे, सकस आहे व वैशिष्ट्यपूर्ण आहे, ते समाजापर्यंत पोहोचविणारे कार्यक्रम सादर केले जातात. अपारंपरिक शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण नागरिक घडविण्याचे काम ग्रंथालयातर्फे उत्तम प्रकारे केले जाते. 'अभ्यासिका' हा विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेला, ऐरोली शाखेचा एक महत्त्वाचा उपक्रम! गेल्या १० वर्षांत, वेगवेगळ्या शाखांमध्ये उच्चशिक्षण घेणाऱ्या सुमारे ६५०० विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेच्या माध्यमातून स्पृहणीय यश संपादन केले आहे. या वर्षी अभ्यासिकेत 'क्लोज सर्किट टी.व्ही' यंत्रणा बसविण्यात आली. यामुळे तळमजल्यावर असलेल्या कार्यालयात बसून दुसऱ्या मजल्यावरील अभ्यासिकेवर लक्ष ठेवता येते.

मुख्य सभागृहाचा व प्रसाधनगृहांच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन आहे. शाखेच्या कारभाराचा पसारा वाढत आहे. या ना त्या नात्याने संस्थेशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाची अपेक्षा वाढत आहे. ग्रंथालयाचे वाचक, अभ्यासिकेचे विद्यार्थी, कार्यक्रमांना येणारे रसिक व सभागृह नोंदणी करणारे ग्राहक, सर्वांच्याच संस्थेकडून मोठ्या अपेक्षा आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्याचे बळ आम्हाला लाभो हीच त्या परमेश्वराकडे प्रार्थना!

जरी विसंबून या बाहूंवर,
कुणी बिलगला रसिक, ग्राहक
तो नच व्हावा वंचित रतिभर,
इतुके द्या अवसान,
प्रभो, मज अन्य नको वरदान.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या योग्य मार्गदर्शनामुळे ऐरोली शाखेची वाटचाल संस्थेच्या घोषवाक्याला अनुसरून सुरू आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती सर्व कर्मचारी, कंत्राटदार तसेच इतर सर्व संबंधितांची आभारी आहे.
धन्यवाद !

शं. गो. वीरकर (कार्यवाह) डॉ. आ. रा. कट्टी (अध्यक्ष)

## कला विभाग - ऐरोली शाखा

श्री. कि. म. पेंढरकर (अध्यक्ष), श्री. वि. दा. जगताप (कार्यवाह), श्री. प्र. श्री. नाटेकर, श्री. दिलीप देवधर, श्री. मोरेश्वर गोखले

सविनयतेने, अत्यंत आनंदाने आणि कर्तव्यबुद्धीने आम्ही सन २०१३-२०१४ या वर्षाचा अहवाल सादर करीत आहोत. कलाविभागाचे धोरण कायमच प्रबोधनात्मक, वैविध्यपूर्ण, दर्जेदार, कलात्मक व नवोदिताना व्यासपीठ देणारे आहे. या धोरणानुसारच उत्तम व दर्जेदार कार्यक्रम देण्याचा कला विभागातर्फे प्रयत्न करण्यात आला.

या वर्षाच्या कार्यक्रमांचा शुभारंभ, प्रथितयश लेखक-श्री. चं.प्र. देशपांडे यांनी लिहिलेल्या व विविध नाट्यस्पर्धांतून अनेक पारितोषिके प्राप्त झालेल्या,'ए, आपण चहा घ्यायचा?' या अभिजित झुंझारराव दिग्दर्शित नाटकाने करण्यात आला.

सुप्रसिद्ध लेखक विजय तेंडुलकर यांच्या ५ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी लिहिलेल्या व अतिशय गाजलेल्या अशा 'मादी' व ''अजगर आणि गंधर्व'' या दोन एकांकिका, समीर गरूड यांच्या निर्मितीखाली, विक्रम गायकवाड ('उंच माझा झोका' मालिकेतील न्यायमूर्ती महादेवराव रानडे) 'तू तिथं मी' या मालिकेतील श्रेया बुगडे, अक्षता कुलकर्णी-गायकवाड(लेक लाडकी या घरची) इत्यादी कलाकारांनी अतिशय सुंदर पद्धतीने सादर केल्या.

आजच्या धकाधकीच्या युगात, निर्माण झालेली गंभीर समस्या म्हणजे मानसिक ताणतणाव, विशेषतः तरूण पिढीत आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो, अनेक तरूण-तरूणींमध्ये, डिप्रेशन, टेन्शन, नकारात्मक व आत्महत्येचे विचार, द्विधा मनस्थिती या सर्व समस्यांवर-संमोहनाच्या (हिप्नॉटिझम) साह्याने मात करणे शक्य आहे , असे जगप्रसिद्ध संमोहन तज्ज्ञ श्री. सचिन राणे यांचे ठाम मत आहे. श्री. सचिन राणे यांनी व्याख्यान व संमोहन प्रात्यक्षिकांतून 'संमोहनातून व्यक्तिमत्त्व विकास' या कार्यक्रमाद्वारे अतिशय सुंदर पद्धतीने सादर केले. प्रश्नोत्तरांच्या शेवटच्या भागांत प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला व अडीच तासांचा निर्धारित कार्यक्रम जवळजवळ साडेचार तास चालून शेवटी प्रेक्षकांना विनंती करून थांबवण्यात आला.

'आकाशवाणी-मुंबई केंद्र' हे रोज ऐकू येणारे वाक्य आताशा शहरांमधून जरा कमी ऐकू येऊ लागले असले तरी, या कार्यक्रमांचे निवेदन व सूत्रसंचालन करणाऱ्यांकडे अनेक गंमतीशीर प्रसंग व त्याचबरोबर कित्येक हळवे प्रसंग, त्यांना वेगळाच अनुभव देऊन जातात.

हे अनुभव, किस्से आकाशवाणीवरील सुप्रसिद्ध निवेदक श्री. किशोर सोमण व श्री. राजेंद्र पाटणकर यांनी 'काचेपलीकडले किस्से' या कार्यक्रमाद्वारे उपस्थित श्रोत्यांना कथन करून अनेक सुप्रसिद्ध कलाकारांच्या बाबतीतले, श्रोत्यांना माहीत नसणारे किस्से सांगितले.

महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली येथील सभागृह हिंदुस्तानी शास्त्रीय रागदारीच्या सुरावटीने भारून निघाले ते सुप्रसिद्ध गायिका श्रीमती सारंगी आंबेकर यांच्या शास्त्रीय व गझल गायनाने. या अप्रतिम कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दूरदर्शनच्या श्रीमती दीपाली केळकर यांनी केले.

'को-जागर्ती' म्हणत ऐरोलीकर श्रोत्यांनी कोजागरीची रात्र जागवली ती साक्षी पाटील, गीता देशपांडे, मयूर सुकाळे इत्यादी कलाकारांच्या सुश्राव्य गायनाने व त्यास श्री. पराग कोळी यांनी तबल्यावर दिलेल्या उत्तम साथीने. या कार्यक्रमाची सांगता चंद्राच्या साथीने, अल्पोपाहार आणि मसाला दुधाचा आस्वाद घेत संघाच्या गच्चीवर झाली.

श्री. सूर्यकांत जाधव यांनी समाजकार्य करताना, त्यांना आलेले अनुभव अतिशय सुंदर पद्धतीने, कवितेच्या माध्यमातून हसता-हसता अत:र्मुख करत, विडंबनात्मक पद्धतीने मांडले. हसून-हसून पोट दुखत असताना अचानक विचार करायला लावून अंत:र्मुख करणारे अनेक प्रसंग आपल्या कवितांतून निवेदनातून श्री. सूर्यकांत जाधव यांनी 'हास्याची साखर वाटी-मिठी-मिठी' या त्यांच्या एकपात्री कार्यक्रमातून श्रोत्यांसमोर उलगडले. बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन, मतिमंद मुलांच्या शाळेत मानद सचिव म्हणून कार्यरत असताना 'स्नेहांकित -हेल्पलाईन' या अंधविद्यार्थ्यांसाठी असलेल्या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली शाखेचे सभागृह पुन्हा एकदा शास्त्रीय संगीताच्या सुरावटीने न्हाऊन निघाले, ते सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित प्रदीप नाटेकर यांच्या अतिशय शास्त्रशुद्ध, दमदार अशा गायनाने. आपल्या संस्थेचे सचिवपद भूषविणारे पंडित प्रदीप नाटेकर ज्यांनी पंडित राम मराठे, पंडित मधुकर जोशी, पंडित राजारामबुवा पराडकर व पंडित नरेंद्र कणेकर यासारख्या मातब्बर गुरूंकडे गायनाचे शिक्षण घेतले व तीच परंपरा पुढे चालवत आज ते अनेक विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देत आहेत. त्यांचा हा पैलू या कार्यक्रमाद्वारे ऐरोलीतील श्रोत्यांना उलगडला व श्रोत्यांनी त्यांच्या उच्च दर्जाच्या गायनाचा आनंद अनुभवला.

लोकसभा निवडणुकींच्या तोंडावर, राजकीय पक्षांची आश्वासने, जागतिक आर्थिक स्थिती आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, याचे विश्लेषण, महाराष्ट्र सेवा संघाचे विश्वस्त, अर्थविभाग प्रमुख, सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. अभिजित फडणीस, यांनी केले. रसिकांनी या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभाग घेतला व या सत्रात झालेली चर्चा अतिशय प्रबोधनात्मक झाली. हा कार्यक्रम देखील निर्धारित वेळेपेक्षा लांबून प्रश्नोत्तरे आटोपती घ्यावी लागली.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील ऐरोली शाखेतर्फे एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली, एकूण ३३ स्पर्धकांनी भाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. दरवर्षागणिक स्पर्धकांचा दर्जा उंचावत चालला आहे याचा आम्हांस आनंद होत आहे.

ऐरोली शाखा कलाविभागातर्फे, कोकण मराठी साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या, राज्यस्तरीय साहित्य अभिवाचन स्पर्धेत सुप्रसिद्ध लेखक श्री.रत्नाकर मतकरी यांच्या 'कुणास्तव कुणीतरी' व 'खेकडा' या दोन कथांचे श्री. किशोर पेंढरकर यांच्या दिग्दर्शनाखाली, श्रीमती अंजली पेंढरकर, श्री. प्रवीण नार्वेकर आणि कुमारी क्षितिजा पेंढरकर यांनी अभिवाचन केले. या अभिवाचनात दिग्दर्शनाचे प्रथम, उत्कृष्ट अभिवाचनास द्वितीय व संस्थेस तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. प्रेक्षक व स्पर्धकांनी आपल्या कलाकृतीस उत्कृष्ट दाद देऊन गौरविले. या पारितोषिकप्राप्त कलाकृतीचे सादरीकरण जागतिक मराठीभाषा दिनानिमित्त महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड ऐरोली शाखा, ग्रंथालयातर्फे आयोजित करण्यात आले. त्यास देखील उपस्थित श्रोत्यांनी मन:पूर्वक प्रतिसाद दिला.

वर्षभरांत सादर करण्यात आलेल्या विविध कार्यकमात रसिक-श्रोत्यांनी चांगली उपस्थिती लावून सर्व कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.

आगामी वर्षी देखील विविधरंगी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा आम्ही प्रयत्न करू. कला विभागाच्या सर्व कार्यक्रमांना कार्यकारी मंडळाचे उत्तम सहकार्य, मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. सर्व कार्यकारी मंडळाचे आभार, तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी, कामत बँन्क्वेट्स व सर्व कार्यक्रमांना विविध वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली त्या बद्दल सर्वांचे आभार.

श्री. वि. दा. जगताप
कार्यवाह

श्री. कि.म. पेंढरकर
अध्यक्ष

# मैत्री

सुनीता देवधर (अध्यक्ष), विजया गोखले (उपाध्यक्ष), दर्शना निमसे (कार्यवाह), शैला ब्राह्मणकर (सहकार्यवाह)
**सदस्य**- आराधना दाभोळकर, दीपिका साळसकर , मंदा कदम , माधवी देशमुख, जया वानखेडे, प्रिया थोरात, हेमा दळवी, दक्षता झगडे, विजया मढवी

## मैत्री - प्रगत वाटचाल

'नेमेची येतो मग पावसाळा' याप्रमाणेच दरवर्षी घेवून येणाऱ्या नवनवीन कल्पना, उपक्रम आणि भरगच्च कार्यक्रमांनीयुक्त असा हा नेहमीचा अहवाल सादर करताना आनंद होत आहे. मैत्रिणींशी सुसंवाद साधत मैत्री ने यावर्षी अनेक कार्यक्रम आयोजित केले.

**संस्कार शिबिर : १५ एप्रिल ते २३ एप्रिल २०१३** - आठ ते चौदा वर्षे या वयोगटातील मुलांमुलींसाठी प्रतिवर्षाप्रमाणे संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले. ऐरोलीमधील शाळांतून एकूण १०५ विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. यावर्षी संस्कार शिबिराचा विषय होता 'गम्मत जम्मत' शिबिरार्थींना दररोज मिळणारा पौष्टिक खाऊ हे देखील या संस्कार शिबिराचे खास वैशिष्ट्य

- **१५ एप्रिल २०१३ :**शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहुणे शामराव देसाई यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. पाहुण्यांनी 'चला गोष्टी ऐकू या ' या सदरात अनेक बोधपर गोष्टी, कविता मुलांना ऐकविल्या.
- **१६ एप्रिल २०१३ :** मैत्रीच्या सभासदांनी मुलांना शिवणकाम व विविध प्रकारची कागदी फुले बनविण्यास शिकवले.
- **१७ एप्रिल २०१३ :** 'फन विथ मॅथ्स' या विषयावर रुपेश गेसोता यांनी गणितातील गमतीजमती मुलांना कथन केल्या.
- **१८ एप्रिल २०१३:** बँकाचे व्यवहार कसे चालतात हे समजण्यासाठी मुलांसमवेत अभ्युदय बँकेस भेट दिली. बँकेचे मॅनेजर श्रीकांत यल्लतीकर यांनी बँकेच्या व्यवहाराविषयी मुलांना माहिती दिली.
- **१९ एप्रिल २०१३ :** श्री प्रशांत निगडे यांनी अभिनय कार्यशाळा घेतली.
- **२० एप्रिल २०१३ :** नवरत्न मित्रमंडळातर्फे खो-खो चे प्रशिक्षण देण्यात आले.
- **२२ एप्रिल २०१३:** हस्ताक्षर कौशल्य या कार्यक्रमांतर्गत संदीप चव्हाण व विजय शिर्के यांनी अक्षर कसे सुधारावे याबाबत मार्गदर्शन केले.
- **२३ एप्रिल २०१३: संस्कार शिबिर सांगता समारंभ** - या समारंभात ज्ञानप्रबोधिनी (डोंबिवली) या संस्थेच्या ज्योती कर्वे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मुलांनी बनविलेल्या कागदी व कापडी पिशव्या, पेंटिग्ज, हस्तलिखिते अशा वस्तूंचे प्रदर्शन पाहून पाहुण्यांनी कौतुक केले. प्रदर्शनास 'फुलोरा'असे नाव देण्यात आले होते. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्याचदिवशी चैत्रोत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने सर्वांनी पन्ह्याचा आस्वाद घेतला. 'संस्कार शिबिर काळाची गरज' या विषयावर पाहुण्यांचे भाषण झाले. 'संस्कार भारती' ही पुस्तिका मुलांना भेट देण्यात आली.
- **०१ जून २०१३ :** नेसले पाककृती- नेसले इंडिया कंपनी तर्फे अक्षता भोईटे, विशाखा कराळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खाद्यपदार्थांच्या नवीन उत्पादनाद्वारे कलाकंद, चॉकलेट केक, कोकोनट माईस, असे चमचमीत पदार्थ प्रात्यक्षिकासह बनवायला शिकविले. मैत्रिणींनी मोठया संख्येने उपस्थित राहून या पदार्थांचा आस्वाद घेतला.
- **१५ जून २०१३ : अर्धीमुर्धी कहाणी** - सुप्रसिध्द लेखिका इंदिरा गोस्वामी यांच्या आत्मचरित्रावर आधारित (अर्धीमुर्धी कहाणी) हा कार्यक्रम मधुरा महंत यांनी सादर केला. मैत्रिणींना हा कार्यक्रम खूपच आवडला.
- **०६ जुलै २०१३ : श्रावणसरी** - हा पावसांच्या कवितांवर आधारित एक संगीतमय कार्यक्रम सादर झाला. भावना दांडेकर, गौरी पतंजली यांच्या गोड स्वरांनी कार्यक्रमाला चांगलीच रंगत आली. कार्यक्रमास तबल्यावर साथ - श्री देशपांडे व हार्मोनियम वर श्री भागवत यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुरा महंत यांनी केले. मैत्रिणी पावसाच्या गाण्यात भिजून गेल्या.
- **२० जुलै २०१३ : जपान एक आनंददायी प्रवास** - या कार्यक्रमात प्रियांका मोकाशी आणि माधुरी पाटणकर यांनी जपान प्रवासातील आपले अनुभव सांगितले. तेथील सणवार,रुढी-चालीरीती या विषयीची माहिती रंजकतेने विशद केली आणि मैत्रिणींना जपानची सफर घडवून आणली.
- **०३ ऑगस्ट २०१३ : कार्यशाळा** - राखीपौर्णिमेच्या निमित्ताने पिडीलाईटच्या विद्या अनघोळकर यांनी पेपर क्विलींगच्या वापरातून नवीन प्रकारच्या राख्या बनविण्यास शिकविले. फॅब्रिक पेंटिग्जचे प्रशिक्षण देताना विविध प्रकारची फुले, पाने, वेलबुटयांचे प्रकार शिकविले. या कार्यशाळेत मैत्रिणींनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

- **१८ ऑगस्ट २०१३ : पाककला स्पर्धा** - विषय होता ओल्या किंवा सुक्या मक्यापासून बनवलेले गोड किंवा तिखट पदार्थ. यात मैत्रिणींनी खूपच आवडीने पदार्थाची चव व सजावटीकडे लक्ष दिले. उमा अमृते आणि निशा बर्वे या परीक्षक म्हणून लाभल्या होत्या. उमा अमृते यांनी पाककलेविषयी बोलाताना मक्यापासून पुरणपोळी कशी बनवायची ही पाककृती सांगितली.
- **२० , २१ , २२ सप्टेंबर २०१३ : ग्राहक मेळावा** - विविधोपयोगी घरगुती वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री असे मेळाव्याचे स्वरूप होते. श्रीमती सुलभा धोंडे - (एस. अँड एच. बॅग्ज कंपनी च्या प्रमुख संचालिका) यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या ग्राहक मेळाव्यात खाद्यपदार्थ, मसाले, लोणची, आधुनिक कपडे, सोन्याचे व मोत्याचे दागिने, साडया, चादरी, पर्सेस, अपंग मुलांनी बनवलेली ग्रीटिंग्ज, मेणबत्या, पणत्या, आकर्षक शोभेच्या भेटवस्तू व खाद्यपदार्थांचे स्टॉल्स हे माफक दरात उपलब्ध होते. पाहुण्यांनी हे पाहून समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर सर्व स्टॉलधारकांना आपला उद्योग वाढविण्यासाठी कष्ट, परिश्रम, प्रामाणिकपणा या गुणांबरोबरच मालाचा दर्जा उत्कृष्ट ठेवण्यासाठी काय करावे याचे मार्गदर्शन केले. मेळाव्याच्या समारोपाला शुभलक्ष्मी छापवाले उपस्थित होत्या. त्यांनीही असेच आपले अनुभव सांगितले. मेळाव्याचे खास वैशिष्ट म्हणजे ५००/- व २०००/-रुपयांच्या खरेदीवर आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. पाहुण्यांचे भाषण हे स्टॉलधारकांसाठी अतिशय प्रभावी व प्रेरणादायी ठरले. भेटवस्तू योजनेमुळे विक्रीवर चांगला परिणाम झाला. एकूण ६९ स्टॉल्स होते. त्यातील एक अपंगासाठी मोफत देण्यात आला होता. प्रत्येक स्टॉलधारकासाठी तीन दिवसांसाठी रुपये १०००/- प्रवेश फी आकारण्यात आली होती. या मेळाव्यातून एकूण रुपये ४१७१६/- ची रक्कम संस्थेकडे सुपूर्द करण्यात आली.
- **०५ ऑक्टोबर २०१३ : पारंपरिक वेशभूषा स्पर्धा** - अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषा करून या स्पर्धेत भाग घेतला. ३ उत्तम वेशभूषांना पारितोषिके देण्यात आली. त्यानंतर सर्व मैत्रिणींनी मिळून भोंडला व मंगळागौरीच्या गाण्यांवर मनमुराद नृत्याचा आनंद लुटला.
- **१९ ऑक्टोबर २०१३ :** अनुवाद क्षेत्रातील गंमती जमती वरील विषयावर डॉ. विशाखा ठाकूर यांनी आपले विचार मांडले. भाषांतरातील गंमतीजमती सांगताना मैत्रिणींशी सुसंवाद साधला.
- **१६ नोव्हेंबर २०१३ : परिसंवाद-** प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनाचे उत्तरायण समृध्द करण्यासाठी मैत्री महिला विभागातर्फे परिसंवादाचे आयोजन केले होते. शीर्षक होते 'उतारवयाचे स्वागत- करुया हंसत खेळत' या परिसंवादास तज्ज्ञ डॉक्टर्स - डॉ. श्रीधर नाईक (सी.ई.ओ माथाडी कामगार हॉस्पिटल ), डॉ. संजय जाधव (मानसोपचार तज्ज्ञ ),डॉ. थोरात (ऑर्थोपेडिक सर्जन ) यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या संयोजक डॉ. भारती मोरे(स्त्री रोगतज्ज्ञ व प्रसुतितज्ज्ञ) या होत्या. १२५ स्त्री-पुरुषांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. यानिमित्ताने हाडांच्या घनतेची तपासणी मोफत करण्यात आली. डॉक्टरांनी उपस्थितांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले.
- **२ डिसेंबर २०१३ : मैत्री चा ९ वा वर्धापनदिन सोहळा** - मनाचा उत्साह वाढवणारा, नव्याने उभारी देणारा असा हा वर्धापनदिन सोहळा. पहिल्या सत्राच्या प्रमुख पाहुण्या सुप्रसिध्द लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रामीण व शहरी स्त्रियांचे नाते (अनुभवातून) हा डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या व्याख्यानाचा विषय होता. हा त्यांच्या प्रबंधाचा विषय असल्यामुळे अनेक ग्रामीण कुटुंबामध्ये राहून, भेटीगाठी घेऊन ग्रामीण स्त्रियांच्या जीवनाविषयीचे अनुभव व त्यांचा जीवन संघर्ष आपल्या कथनातून कथन केले. त्यांचे अनुभव ऐकताना साऱ्यांना गहिवरुन आले. मध्यंतरात गरमागरम कॉफीचा आस्वाद घेत श्रोते दुसऱ्या सत्रासाठी तयार झाले. दुसऱ्या सत्राचे आकर्षण होते- कसलेली अभिनेत्री सविता मालपेकर - चित्रपट : काकस्पर्श, नाटक : गाढवाचं लग्न, दूरदर्शन मालिका : फू बाई फू, तुझं माझं जमेना, लक्ष्मी सरस्वती यांतील त्यांच्या भूमिका खूपच गाजल्या. प्रथितयश मुलाखतकार श्रेयसी वझे - मंत्रवादी यांनी त्यांना बोलते केले. वयाच्या तेराव्या वर्षापासून स्थानिक कार्यक्रमांतून अभिनयाला सुरुवात करणाऱ्या सविता मालपेकर यांनी अगदी मोकळेपणाने प्रश्नांना उत्तरे दिली. या सिनेमा-नाटकांच्या मोहमयी विश्वात अथक कष्टाने, सातत्याने प्रामाणिक प्रयत्नांमुळे व कामावरील निष्ठेने त्यांनी जे प्रबळ स्थान मिळविले आहे त्याबद्दलची कथा ऐकताना अनेकदा उपस्थित महिला भावूक झाल्या. मेहनतीला व कष्टाला पर्याय नाही - हा संदेश त्यांच्या मुलाखतीतून अनेक तरुणींना मिळाला. तसेच 'हसत हसत जीवनाला सामोरे जा' हा मूलमंत्रही त्यांच्या मुलाखतीतून सर्वांना मिळाला. त्यानंतर सविताताईंच्या हस्ते वर्धापनदिनाचा केक टाळयांच्या गजरात कापण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता खमंग अशा अल्पोपाहाराने झाली. इथून जाताना आमच्या मैत्रिणी बरंच काही घेऊन जातात - बौद्धिक, वैचारिक खाऊ मिळाल्यामुळे समृध्द होतात.
- **२१ डिसेंबर २०१३ : कथाकथन स्पर्धा-** या स्पर्धेचा विषय होता -'सुधा मूर्तींच्या कथा'- मैत्रिणींनी उत्साहाने या कार्यक्रमात

भाग घेतला. सुधा मूर्तींच्या कथा सांगताना प्रत्यक्ष चित्र डोळयांसमोर उभे केले.

- **०४ जानेवारी २०१४ :** 'झुंबा अमेरिकन फिटनेस डान्स' श्वेता कुलकर्णी यांनी संगीताच्या आधारे डान्स करत शारीरिक फिटनेस कसा ठेवू शकतो याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकाद्वारे दिले. कार्यक्रम रंगतदार व मनाला उर्जा देणारा होता.
- **१८ जानेवारी २०१४ : तीळगूळ समारंभ** या निमित्ताने प्रसिद्ध लेखक व.पु.काळे यांच्या कथांवर आधारित कार्यक्रम श्रीमती वैशाली घांग्रेकर यांनी सादर केला. मैत्रिणी खूपच मंत्रमुग्ध झाल्या. सर्व मैत्रिणींना तीळगूळ व संक्रात भेट देण्यात आली.
- **०८ फेब्रुवारी २०१४ : महिमा ॐकाराचा** हा संगीतमय मनोरंजनात्मक कार्यक्रम प्रसिध्द कीर्तनकार सुनीताताई रानडे (कल्याण ) यांनी सादर केला . त्यांनी निरुपणाद्वारे ॐकाराचे महत्त्व विशद केले. प्रेक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती.
- **१५ फेब्रुवारी २०१४ : मैत्री विषयी माझे मनोगत** - मैत्रीच्याच सभासदांनी चर्चात्मक सादर केलेला असा कार्यक्रम. मैत्रीचे हे यंदाचे १० वे वर्ष. तेव्हा मागे वळून पाहताना मैत्रीविषयी आपल्याला वाटणारे आपुलकीचे नाते अधिकाधिक दृढ व्हावे यासाठी त्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी व सुसंवाद साधण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अनेक मैत्रिणींनी सहभाग घेतला. त्यांनी काही रचनात्मक सूचना , मते मांडली.
- **०१ मार्च २०१४ : गौरव स्त्रीशक्तीचा** -जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून, सामान्यात राहून असामान्य कार्य करणाऱ्या महिलेचा सत्कार असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. 'वात्सल्य ट्रस्ट' ही अनाथ मुलांना आश्रय देणारी संस्था. या संस्थेच्या विश्वस्त माजी आमदार श्रीमती संजीवनी रायकर यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी आपल्या वक्तव्यातून आपण ज्या समा-जात राहातो त्या समाजाचे काही देणे लागतो या भावनेतूनच आपण समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काहीतरी केले पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या. श्रीमती संजीवनी रायकर यांना गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या निमित्ताने 'एक स्वप्न पुन्हा पुन्हा' हा पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई गोपाळ जोशी यांच्या जीवनावर आधारित नाटयसंवाद सादर केला गेला. रश्मी अनगळ आणि मेधा देव यांनी डॉ. आनंदीबाईंचा जीवनपट डोळयासमोर उभारताना त्यांची डॉक्टर होण्याची इच्छा व त्यासाठी त्यांनी केलेले अथक परिश्रम हे सारे ऐकत असताना मैत्रिणींना गलबलून आले. मनाला स्पर्शून जाणारा अंतर्मुख करणारा असा हा कार्यक्रम होता.
- **१५ मार्च २०१४ : साठवणीतील पु.ल.** -लेखक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यावर आधारित असा कार्यक्रम. प्रियांका मोकाशी, मधुरा महंत आणि रजनी करंदीकर यांनी आपल्या सुस्पष्ट वाचनशैलीतून पु.लं च्या साहित्यातील विनोद, गमती-जमती मैत्रिणींसमोर मांडल्या. हे ऐकताना हास्याचा आनंदही मैत्रिणींनी भरपूर लुटला. कार्यक्रम खूपच छान होता अशा प्रतिक्रिया उपस्थितांनी दिल्या.

संस्थेच्या पाठिंब्यामुळे व मैत्रिणींच्या सहकार्यामुळेच आज 'मैत्री' ची वाटचाल यशस्वीरीत्या होत आहे. आम्ही कृतज्ञ आहोत, लोभ आहेच, तो वृध्दिंगत व्हावा.

दर्शना निमसे, कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

## ऐरोली ग्रंथालयाचे 'सुनीता म. देवधर ग्रंथालय असे नामकरण तसेच श्री. म. बा. देवधर यांनी व्यसनमुक्तीविषयी लिहिलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन

दि. ५ एप्रिल २०१४ रोजी ऐरोली शाखेच्या ग्रंथालयाचे नामकरण श्रीमती सुनीता म. देवधर ग्रंथालय असे करण्यात आले. या समारंभप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री. म. बा. देवधर लिखित व संस्थेचे दुसरे विश्वस्त डॉ. आ.रा कट्टी यांची प्रस्तावना लाभलेल्या 'नशासुराचे विश्वव्यापी थैमान' या पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन या समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष तसेच रोटरी इंटरनॅशनल या जागतिक स्तराच्या संस्थेचे माजी प्रांतपाल डॉ. बाळकृष्ण इनामदार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी खास अतिथी या नात्याने 'झी टेलिव्हिजन'चे प्रमुख डॉ. उदय निरगुडकर हे उपस्थित होते. दोन्ही अतिथींनी उपस्थित रसिकांना आपल्या भाषणाने मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमानंतरच्या दुसऱ्या सत्रात पी सावळाराम यांच्या गीतांवर आधारित 'मानसीचा चित्रकार तो' हा संगीतमय कार्यक्रम सादर करण्यात आला.

## सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - मुकुंद बालंखे , कार्यवाह - अंजली पेंढरकर

सभासद :- आराधना दाभोळकर, संगीता जोशी, वीणा ढोले (वाचक प्रतिनिधी)

रसिकांना, वाचकांना सप्रेम नमस्कार!

महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, ऐरोली शाखेचे ग्रंथालय म्हणजे या सांस्कृतिक केंद्राचा महत्त्वाचा विभाग! आर्थिक वर्ष २०१३-१४ चा अहवाल सादर करताना खूप समाधान वाटते आहे. कारण या वर्षाच्या सुरूवातीपासूनच आम्ही काही धोरणात्मक वाटचाल करावयाचे ठरविले आणि योग्य ते बदल, योग्य ती दर्जात्मक सुधारणा घडवणे साध्य झाले.

वाचकांशी संवाद वाढविला. प्रत्येक मासिक सभेत वाचकांच्या सूचना, पुस्तकांच्या मागण्यांची सातत्याने दखल घेतली व त्यांना प्रतिसादही देत गेलो त्यामुळे वाचकांचा सहभाग वाढला. वाचकांच्या अडचणींवरही कार्यवाही केली. याचेच फलित म्हणून यंदाच्या वर्षी दिवाळी अंकांच्या सभासदांची संख्या गेल्या अनेक वर्षांपेक्षा उच्चतम (५२ सभासद) झाली.

वाचकांचा विश्वास प्राप्त करून, पूर्वी पुस्तकाच्या सभासदांना एक मासिक वाचावयास दिले जायचे, त्याऐवजी पुस्तक व मासिक यांचे सभासदत्त्व वेगळे करण्यात आले. ज्यामुळे फक्त मासिकांचीही वेगळी सभासद संख्या मिळाली, ग्रंथालयाच्या उत्पन्नात वाढ झालीच शिवाय पुस्तके व मासिके यांच्या परत येण्याचा अनियमितपणाही लक्षणीय कमी झाला.

बालविभागाला प्रोत्साहन देण्यासाठी मागील वर्षातच अमर चित्रकथांचे संच श्री दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले होते. हा उपक्रम पुढे नेऊन दि. ०९.११.२०१३ रोजी सुप्रसिद्ध जादूगार श्री. सुनील कामत यांचे जादूचे प्रयोग आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला २०० ते २५० छोट्यांनी व ५० ते ६० मोठ्यांनी भरगच्च प्रतिसाद दिला. दिवाळीच्या सुट्टीतील हा चटकदार मेवा छोट्यांनी फारच आवडीने गट्ट केला.

स्वामी विवेकानंदाच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून 'योद्धा संन्यासी' हा गीत संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुप्रसिद्ध गायिका-संगीत दिग्दर्शिका सौ. शीला जोशी व त्यांच्या सहकलाकारांनी सादर केलेल्या या सुमधुर कार्यक्रमाचा आस्वाद रसिक प्रेक्षकांनी घेतला त्याचवेळी 'विवेकानंद विचार प्रसार समिती'चे अध्यक्ष (नवी मुंबई) श्री. विवेक सुन्नपवार यांचेही अत्यंत सुदर, साधे परंतु विचार प्रवर्तक असे व्याख्यान झाले; जे प्रेक्षकांना वेगळी दिशा देऊन गेले.

जागतिक मराठी भाषादिनानिमित्त दि. २३.०२.१४ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक श्री. अशोक समेळ यांचे 'साहित्य, नाट्य, चित्रपट मालिका व रोजच्या व्यवहारातील मराठी' या विषयावर प्रेक्षकांशी थेट संवाद साधणारे सुंदर व्याख्यान झाले. सुप्रसिद्ध कलाकार संग्राम समेळ यांनी नाटक व मालिकेतील काही प्रवेश सादर केले. तसेच याच कार्यक्रमात
म.से.सं. मुलुंड ऐरोली शाखा, कला विभागातर्फे राज्यस्तरीय साहित्य अभिवाचन स्पर्धेत विजेती ठरलेली कलाकृती सादर करण्यात आली. सुप्रसिद्ध लेखक श्री. रत्नाकर मतकरी यांच्या २ कथांचे वाचन श्री. प्रवीण नार्वेकर, कु. क्षितिजा पेंढरकर व सौ. अंजली पेंढरकर यांनी केले. कलाकृती व दिग्दर्शनाचे, श्री. अशोक समेळ यांनी भरघोस कौतुक केले. अर्थातच प्रेक्षकांनीही भरघोस प्रतिसाद व दाद दिली.

ग्रंथ म्हणजे समाजाच्या सांस्कृतिक पायाचा आत्माच! म्हणून त्यांची योग्य निगा हीच ग्रंथालयाची मुख्य जबाबदारी. नियमितपणे नवीन पुस्तकांची खरेदी, जुन्या पुस्तकांची पुनर्बांधणी आणि योग्य ते वर्गीकरण या सगळ्यासह ६२०४ पुस्तके आणि ४५४ सभासद यांचा कार्यभार उत्कृष्टपणे पेलण्यात अर्थातच सर्व कर्मचारी वर्गाचा महत्त्वाचा सहभाग! ऐरोली शाखेच्या व्यवस्थापिका सौ. मेघा भावे यांनी अतिशय समर्पक पद्धतीने तसेच ग्रंथालय , कार्यालयाच्या दैनंदिन कारभारात कुठलाही व्यत्यय येऊ न देता ग्रंथमोजणी यशस्वीपणे पार पाडली. त्याबद्दल त्यांना विशेष कौतुकाचे पत्र देण्यात आले. सर्व कर्मचारी वर्गाचे आभार व अभिनंदन!

मुख्य कार्यकारिणी अध्यक्ष डॉ. आनंद कट्टी, उपाध्यक्ष श्री. प्रदीप सप्रे, व कार्यवाह श्री. शं.गो.वीरकर यांचे संपूर्ण सहकार्य, प्रोत्साहन यामुळेच ही यशस्वी वाटचाल साध्य करता आली त्यांचे मन:पूर्वक आभार!

अंजली पेंढरकर, कार्यवाह　　　　मुकुंद बालंखे, अध्यक्ष

## अभ्यासिका

वि.द. जगताप (अध्यक्ष) आरती सप्रे (सभासद) मु.शं. बालंखे (सभासद)

या उपक्रमाने अतिशय उत्तम कामगिरी केली आहे. प्रथम सत्रात ५१७ व द्वितीय सत्रात ५४७ विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत प्रवेश घेतला. दुसऱ्या सत्रामध्ये जागे अभावी प्रवेश बंद करण्यात आला. विद्यार्थ्यांना विविध सुविधा देत असताना संस्थेच्या सुरक्षिततेसाठी इमारतीमध्ये व मुख्यतः अभ्यासिकेमध्ये सी.सी.टी.व्ही. लावण्यात आले. त्यामुळे अभ्यासिकेवर कॅमेरातून नजर ठेवण्यास सोपे झाले. नवी मुंबईतील ऐरोली ते पनवेल पर्यंतचे तसेच मुंबईतील अनेक विद्यार्थी आपल्या या उपक्रमाचा लाभ घेतात.

वि.दा. जगताप , अध्यक्ष

## ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ५०३ | ३०२ | ८०५ |

**३१-०३-२०१४ रोजी उपलब्ध ग्रंथ - ६,२०४**

अहवाल वर्षात ३८,०४९/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

| ३१-३-२०१४ अखेर सभासद | विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग |
|---|---|---|---|
| | ४ | १५ | ३२४ |
| ग्रंथ -अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| १०८ | ९ | ३ | ४६३ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके |
|---|---|---|---|---|
| मराठी | ४५ | - | २ | ६ |
| हिंदी | १ | - | – | १ |
| इंग्रजी | ६ | - | – | १० |
| एकूण | ५२ | - | २ | १७ |

**दिवाळी अंक योजना**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ५१ |
| अंकाच्या एकूण प्रती | ८६ |
| खरेदी किंमत रुपये | ८,०२१/- |

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | ९ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, वार्ताहर पुढारी, धावते नवनगर |
| हिंदी | १ | नवभारत टाईम्स |
| इंग्रजी | ४ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, डी.एन्. ए., मुंबई मिरर |

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे देण्यात आलेले सु.ल. गद्रे (मातोश्री) साहित्यिक, कलाकार व कै. ल.ग. गद्रे शैक्षणिक पुरस्कार तसेच सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार खालीलप्रमाणे

| वर्ष | साहित्यिक पुरस्कार | कलाकार पुरस्कार | शिक्षक / संस्था पुरस्कार |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तांसगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | ———- |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| वर्ष | पुरस्कारप्राप्त विद्वान | क्षेत्र |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |

वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.

| वर्ष | पुरस्कारप्राप्त लेखक | साहित्यकृती |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दुःख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान**

| वर्ष | कलाकाराचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|
| २००५ | श्री. दशरथ पुजारी | संगीत |
| २००६ | श्री. के.ज.पुरोहित (शांताराम) | साहित्य |
| २००७ | श्री. भालचंद्र पेंढारकर | नाट्य. |
| २००८ | श्री. सुहास भालेकर | लोकनाट्य |
| २००९ | श्री. मोरेश्वर कुंटे | मंदिर कोशकार |
| २०१० | श्री. प्रभाकर जोग | व्हायोलीन वादक, संगीतकार |
| २०११ | श्री. भा. ल. महाबळ | साहित्य |
| २०१२ | श्रीमती पुष्पा पागधरे | गायन |
| २०१३ | श्री. चंद्रकांत खोत | साहित्य |

**अभिप्राय :**

वाचनालय बघणं ही एक अतिशय आनंदाची गोष्ट असते , त्यात इतकी मोठी पुस्तकसंख्या, प्रत्यक्ष पुस्तकांच्या कपाटाशी जाऊन पुस्तकं हाताळण्याची संधी मिळणे, ही तर फारच मोठी आनंदाची! लेखकांच्या नावानं स्वतंत्र कप्पे बघून वाटतंय, माझ्या नावाच्या पुस्तकांचा कप्पा असेल का कधी ? एवढं लेखन हातून व्हावं , अशी मीच मला शुभेच्छा देऊ इच्छिते. असं नवं स्वप्न दाखवणऱ्या वाचनालयाला विनम्र अभिवादन

.....नीलिमा बोरवणकर

वाचनालये ज्ञानपोईचे काम करतात. उत्तम वाचनालय हे त्या त्या शहरांचे भूषण असते. मुलुंडच्या रसिक व अभ्यासू वाचकांची ज्ञानभूक भागविणाऱ्या वाचनालयाला भेट देताना येथील कार्यकर्ते व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची स्नेहपूर्ण सहकार्याची वागणूक अत्यंत सुखद वाटली. या ग्रंथालयास माझ्या हार्दिक शुभेच्छा

.....श्री. वि. ह. भूमकर